

# स्पंदन

2014-2015

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

नॅक पुनर्मूल्यांकन 'बी' ग्रेड प्राप्त

## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

### रौप्यमहोत्सवी वर्ष

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)



माजी विद्यार्थी मेळावा-संस्था संचालक मा. नेताजी पाटील, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र शेळके



अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'अभिनव कला' या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा. प्रसाद ठाकूर



मराठी विभागाच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विषयाची मांडणी करताना पुजा चौगले (बी. ए. भाग १)



बी. एससी. भाग ३ 'सदिच्छा समारंभ' सायन्स फोरम



स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा - प्रमुख डॉ. डी. एन. पाटील, व्यासपीठावर मा. श्री. विजय पवार प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण विभाग, कोल्हापूर



इस्लापूर येथे झालेल्या आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत उपविजेता संघ



कबड्डी उद्घाटन समारंभ



आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेतील एक क्षण

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)
संचलित

नॅक 'बी' ग्रेड प्राप्त

## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

वार्षिक अंक २२ वा

# स्पंदन

## सन २०१४–१५

### संपादक मंडळ

प्रमुख संपादक

**प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर**

कार्यकारी व विभागीय संपादक

**प्रा. डॉ. सादिक देसाई**

विभागीय संपादक

| | |
|---|---|
| **प्रा. डॉ. संजय पाटील** | मराठी विभाग |
| **प्रा. डॉ. श्रीकृष्ण साळोखे** | इंग्रजी विभाग |
| **प्रा. डॉ. शशिकांत सावंत** | शास्त्र विभाग |

## Vision and Mission of our Institution

- **VISION STATEMENT** - Educating the minds of people to seek the knowledge, truth and good citizenship for the betterment of society.
- **MISSION STATEMENT** - To assure, Quality Higher Education to the stakeholders of the institution through the sustained efforts of self and external evaluation.

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. प्रविणसिंह विश्वनाथ पाटील |
| सदस्य | : | मा. विजयसिंह कृष्णाजी मोरे |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. वसंतराव बापूसो (तु.) पाटील |
| मुख्य सचिव | : | मा. एस. एस. चौगले |
| सचिव | : | प्रा. डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिनकर केरबा शिंदे |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिगंबर दत्तोबा कोमेजवार |
| शिक्षकेतर प्रतिनिधी | : | श्री. प्रल्हाद विश्वास पाटील |

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)



**मा. आमदार श्री. के. पी. पाटील,** अध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री




**मा. श्री. दत्तात्रय तु. खराडे,** उपाध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री
(२८/७/२०१४ पर्यंत)



**मा. श्री. प्रविणसिंह वि. पाटील,** उपाध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री
(२९/७/२०१४ पासून )



**मा. श्री. आर. डी. देसाई,** मानद सचिव
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. श्री. एस. एस. चौगले,** सचिव
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. डॉ. आर. एल. राजगोळकर,** प्राचार्य
श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# मान्यवर संचालक मंडळ


मा. श्री. ए. वाय. पाटील


मा. श्री. विजयसिंह मोरे


मा. श्री. नामदेवराव भोईटे


मा. श्री. दत्तात्रय पाटील


मा. श्री. गणपतराव फराकटे


मा. श्री. वसंतराव पाटील


मा. श्री. पंडीतराव केणे


मा. श्री. केरबा नांदेकर


मा. श्री. धनाजीराव देसाई


मा. श्री. श्रीपतराव पाटील


मा. श्री. जीवनराव पाटील


मा. श्री. नेताजीराव पाटील


मा. श्री. सुनिलराव कांबळे


मा. श्री. राजेखान जमादार


मा. सौ. सविता एकल


मा. सौ. कमल चौगले


मा. श्री. विलासराव झोरे

# संपादकीय



प्रा. डॉ. सादिक देसाई
कार्यकारी संपादक

'स्पंदन' या वार्षिक अंकाचा २२ वा अंक आपल्या हाती देत असताना मला अतिशय आनंद होत आहे.चालू शैक्षणिक वर्षामध्ये मा. प्राचार्यांनी माझ्यावर ऐनवेळी कार्यकारी संपादकाची जबाबदारी देऊन जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी धन्य झालो.

या वर्षातील महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे महाविद्यालयाचे रौप्यमहोत्सवी वर्ष १९९० साली मोजक्या विद्यार्थ्यांवर सुरू झालेले माझे महाविद्यालय आज एक हजारापेक्षा जास्त विद्यार्थी कला व शास्त्र शाखेचा अभ्यास करताहेत. दुधगंगा, वेदगंगा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील मुलांना उच्च शिक्षण कारखाना कार्यक्षेत्रात मिळावे. या उदात्त हेतूने दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळाने दूधसाखर महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या या उदात्त हेतूला तडा जाऊ नये म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकिय कर्मचारी सतत काळजी घेत असतात.

वर्षभरामध्ये क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना तसेच इतर समितीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. त्यांच्या कार्याला उजाळा देण्याचा मी या द्वारे प्रयत्न केला आहे. त्यांनी पार पाडलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांच्या अहवालामध्ये आपल्याला पहायला मिळेलच.

विद्यार्थ्यांच्या साहित्य लेखनाला वाव मिळावा. या हेतून 'स्पंदन' अंकाचे प्रकाशन होते. 'स्पंदन' साठी विद्यार्थ्यांनी विपुल प्रमाणात साहित्य लेखन केले. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेमधील लेख, कविता त्यांची चित्रकला इत्यादी क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयत्नाचे कौतुक करावेसे वाटते. सर्वच साहित्य प्रसिद्ध करण्यात मर्यादा आल्या त्या बद्दल मी दिलगीरी व्यक्त करतो.

आमच्या मातृसंस्थेचे अध्यक्ष मा. के. पी. पाटील साहेब, उपाध्यक्ष मा. खराडेसाहेब व मा. प्रविणसिंह पाटीलसाहेब, कार्यकारी संचालक आर. डी. पाटील, सचिव एस्. एस्. चौगले, मा. नामदेवराव भोईटे साहेब, सर्व मान्यवर संचालक यांची प्रेरणा व सहकारी नेहमी आमच्या सोबत असते.

'स्पंदन' प्रकाशनासाठी संस्थेचे प्रोत्साहन, मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि श्रीपाद ऑफसेटचे मालक श्री. आर. डी. पाटील व त्यांचे सर्व सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळेच मी हा अंक आपल्या हाती देत आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. हा अंक महाविद्यालयाच्या गुणवत्तेत वाढ करेल अशी मी आशा करतो. या अंकातील त्रुटी फक्त माझ्या व चांगल्या गोष्टी आपल्या सर्वांच्या. धन्यवाद!

**थोडस मुखपृष्ठाविषयी...** पुरोगामी चळवळीतील दोन महान विचारवंतांचा दुर्दैवी अवेळी झालेला अस्त ही दुःखद घटना आहे. म्हणूनच सुर्यास्तावेळेचे चित्रण दाखवण्यात आले आहे. हे दोन विचारवंत महाविद्यालयामध्ये प्रबोधनाच्या निमित्ताने उपस्थित राहिले होते. त्यांना श्रद्धांजली या रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये देणे मला योग्य वाटते. त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्या प्रत्येक घटकापासून त्यांना विनम्र अभिवादन.



# मनोगत

**डॉ. आर. एल. राजगोळकर**
प्राचार्य

दूधसाखर महाविद्यालय ब्रिद्री दूधगंगेच्या काठावर डोंगराच्या पायथ्याशी निसर्गरम्य परिसरात वसलेले महाविद्यालय असून चार तालुक्यातील विद्यार्थ्यांची कला व शास्त्र शाखेकडील शैक्षणिक गरज पुरविणारे शिवाजी विद्यापीठ कक्षेमधील दर्जेदार महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. आणि हे नुकत्याच झालेलया नॅकमार्फत गुणवत्ता चाचणीमध्ये 'बी' ग्रेड () मिळवून सिद्ध केले आहे. १९९० ला स्थापन झालेल्या महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. महाविद्यालयाकडे पाहिले जाते आणि हे महाविद्यालयाच्या चालू शैक्षणिक वर्षात झालेल्या विद्यार्थी संख्येच्या वाढीवरून दिसून येते. १०० विद्यार्थी संख्येवरून सुरू झालेले महाविद्यालय आज १४०० विद्यार्थी संख्येवर पोहचलेले आहे. आणि पैकी ६०% पेक्षा जास्त ८०० च्या आसपास विद्यार्थीनींची संख्या असलेली दिसून येते.

महाविद्यालयामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. यु.जी. सी. व लीड कॉलेज अंतर्गत शैक्षणिक, सामाजिक, बौद्धिक, वैयक्तिक गुणवत्ता विकास यासाठी आवश्यक विविध कार्यशाळा आयोजल्या होत्या. १ स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, २- अभिनय कौशल्य विकास, ३- संख्याशास्त्र व गणित विषयावरील कार्यशाळा, ४- लेखन कौशल्य विकास, ५- अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी. त्याचबरोबर जवळ जवळ विविध महाविद्यालयामध्ये दर्जा व गुणवत्ता असलेले विद्यार्थी येतात. त्याचप्रमाणे आपली गुणवत्ता विकसित करताना दिसतात. ५ वर्षापुर्वी ६ ते ७ पी.एच.डी. धारक प्राध्यापक होते. ते आज १७ ते १८ च्या आसपास पोहोचलेले आहेत. आणि १० जण पी.एच.डी. पूर्ण करण्याच्या मार्गावर आहेत.

महाविद्यालयाकडे जवळ जवळ ७० कॉम्प्युटर्स असून सर्व कॉम्प्युटर्स सर्व्हरमार्फत जोडले गेलेले आहेत. इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. इनफ्लिबीनेट या युजीसी ने पुरविलेले ई-पुस्तके उपलब्ध असलेली सेवा महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून असलेली सेवा महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून असलेली सेवा महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली आहे. ऑक्टोंबर २०१४ ते डिसेंबर २०१५ या कालावधीमध्ये सदर सेवेचा लाभ घेणाऱ्या भारतातील १० महाविद्यालयाच्या यादीमध्ये समावेश झाला आहे.

गेल्या ५ वर्षमध्ये ग्रंथालयातील पुस्तकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. आणि ती २०००० ते २२००० च्या आसपास आहे.

क्रीडा विभागाकडील विद्यार्थ्यांचे यश लक्षणिय असून जिम्नॅशिअम मध्ये विद्यापीठाचा संघ सलग

१५ वर्षे विजेता ठरलेला आहे व टीममधील ४ विद्यार्थ्यांचे विद्यापीठ टीममध्ये ग्वाल्हेर स्पर्धेसाठी निवड झाली. कबड्डीमध्ये विजेता ठरलेला आहे. विद्यापीठ संघाचा कर्णधार महाविद्यालय ठरली आहे. मुलींचा ॲथलेटिक्स चा संघ ४ × ४ रिलेमध्ये विजेता ठरलेला आहे. अजिंक्य केसरी कुस्ती स्पर्धा विजेता मानाची गदा मिळविलेला विद्यार्थी महाविद्यालयाचा आहे. वरील सर्व विद्यापीठाच्या संघामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल नॅक समितीने प्रशंसा केली आहे.

सांस्कृतिक विभागाकडील विद्यार्थ्यांची चालू शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये मूकनाट्य, पथनाट्य, समुहगान, वादविवाद स्पर्धेत भाग घेतलेला होता. पथनाट्यामध्ये जिल्हास्तरीय मध्यवती युवा–महोत्सवामध्ये दुसरा क्रमांक मिळविलेला आहे. शिक्षक दिनामध्ये पूर्ण शैक्षणिक कामकाज विद्यार्थ्यांमार्फत राबविले जाते. सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील थोर व्यक्तिंच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. तसेच तसेच एन. एस. एस. विद्यार्थ्यांचा गट सुळंबी, ता. राधानगरी या गावी 'विशेष श्रमसंस्कार' शिबीरामार्फत दाखल होवून समाजसेवा, समाजप्रबोधन, याकरिता कार्यतर होता. एन. एस. एस. च्या युनिटचे विशेष असे कौतुक नॅक समितीमार्फत केले गेलेले आहे.

महाविद्यालयातील ३३ शिक्षकापैकी १८ शिक्षकांनी २०१५ अखेर पी. एच. डी. पदव्या प्राप्त केल्या आहेत. उर्वरित शिक्षक पी. एच. डी. पदवी पूर्ण करण्याच्या मार्गावर आहेत. युजीसी मार्फत ९ मायनर रिसर्च प्रोजेक्ट महाविद्यालयाकडे कार्यरत आहेत. शिक्षकांनी शैक्षणिक वर्षामध्ये १०० च्या आसपास लेख प्रसिद्ध केलेले आहेत. व पुढील १२ व्या योजनेमध्ये रिसर्च प्रोजेक्टसाठी प्रस्ताव सादर केले आहेत. महाविद्यालयाचे प्राध्यापकांचे एम. पी. एस. सी. व विद्यापीठ परीक्षेतील योगदान मोठे आहे.

महाविद्यालयाकडील सर्व लॅबोरेटरीज ICT सुसज्ज झाल्या असून महाविद्यालयाकडे जवळ जवळ ८, एलसीडी प्रोजेक्टर, ७० कॉम्प्युटर्स, ६ लॅपटॉप इत्यादी साहित्य आहे. पूर्ण इमारत CCTV संरक्षणाखाली सुरक्षित करण्यात आलेली आहे. यु. जी. सी. अनुदानतून महिला वसतीगृह उपलब्ध झाले आहे.

स्पर्धा परीक्षा विभागामार्फत राज्य स्पर्धा व केंद्रशासन स्पर्धा परिक्षेसाठी मार्गदर्शन केले जाते. बऱ्याच विद्यार्थ्यांना यश संपादन केलेले आहे.

या महाविद्यायाची यशस्वी वाटचाल चाललेली असून विद्यापीठ अनुदान आयोग केंद्रसरकार, राज्यसरकार यांचे आर्थिक पाठबळ मोलाचे आहे. भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यास महाविद्यालय सक्षम आहे.

महाविद्यालयाच्या वरील सर्व यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष मा. आम. के. पी. पाटीलसो, मा. उपाध्यक्ष दत्तात्रय तु. खराडेसो व मा. प्रविण पाटील, सर्व संचालक मंडळ, सचिव, कार्यकारी संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, भागातील नागरिक, विद्यार्थी यांचा मोठा वाटा आहे.

।। जय हिंद ।।

## स्पंदन अंक प्रकाशन व मालकीसंबंधी माहिती


| | | |
|---|---|---|
| ■ प्रकाशन स्थळ | : | दूधसाखर महाविद्यालय,<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २०८<br>फोन : (०२३५) २५४८२२ |
| ■ प्रकाशन काल | : | वार्षिक |
| ■ प्रकाशक व प्रमुख संपादक मुद्रक | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| ■ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ■ पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय,<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २०८ |
| ■ कार्यकारी संपादक | : | प्रा. डॉ. सादिक देसाई |
| ■ पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय,<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २०८ |
| ■ मुखपृष्ठ | : | वेदांत ग्राफिक्स, कोल्हापूर |
| ■ संकल्पना | : | प्रा. डॉ. सादिक देसाई |
| ■ मुद्रक | : | श्रीपाद ऑफसेट, ४६४ ई, शाहुपूरी, कोल्हापूर |
| ■ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ■ पत्ता | : | व्हिनस कॉर्नर, शाहुपूरी, कोल्हापूर<br>फोन : (०२३१) २६५८४०१ |


---

मी प्राचार्य, डॉ. आर. एल. राजगोळकर असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे खरी आहे.

— प्रकाशक

**टीप** : या अंकात व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)

## आमचे गुणवंत ...


कु. शेणवी सविता ईश्वरा
बी.ए.-३ प्रथम


कु. पाटील दिपाली मारूती
बी. ए.-३ द्वितीय


कु. संकपाळ सुरेखा पांडूरंग
बी. ए.-३ तृतीय


कु. मालवेकर धनाजी बाळासो
बी. एस्सी.-३ प्रथम


कु. पाटील रमेश दिनकर
बी. एस्सी.-३ द्वितीय


कु. पाटील अक्षय आनंदा
बी. एस्सी.-३ तृतीय


कु. फराकटे प्रियांका बाळासो
बी. ए.-२ प्रथम


कु. महाडेश्वर सुप्रिया एकनाथ
बी. ए.-२ द्वितीय


कु. पालकर अर्चना प्रताप
बी. ए.-२ तृतीय


कु. कुदळे वर्षा पिराजी
बी. एस्सी.-२ प्रथम


कु. फासके अश्विनी जयवंत
बी. एस्सी.-२ प्रथम द्वितीय


कु. गौड नंदकुमार हिंदूराव
बी. एस्सी. -२ प्रथम तृतीय


कु. बागवान अफरीन अब्दूल
बी. ए.-१ प्रथम


कु. पाटील चांदणी सातापा
बी. ए.-१ द्वितीय


कु. मोरे सुदर्शन बाजीराव
बी. ए.-१ तृतीय


कु. पाटील श्वेता सातापा
बी. एस्सी.-१ प्रथम


कु. महाडेश्वर पूजा एकनाथ
बी. एस्सी.-१ द्वितीय


कु. पाटील शितल रघुनाथ
बी. एस्सी.-१ तृतीय

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)

## हिंदी स्कॉलरशिप


कु. धाके अंजली
बी. ए. III


कु. फराकटे सिमा
बी. ए. II


कु. पाटील निशिगंधा
बी. ए. I

## विद्यापीठ गुणवत्ता स्कॉलरशिप


कु. फराकटे प्रियांका


कु. कुंभार साऊताई


कु. वर्णे श्रद्धा

## आमचे खेळाडू


माने युवराज
जिमनॅस्टिक
कॉलेज कॅम्पस अॅम्बेसिटर


पाटील अनिकेत
जिमनॅस्टिक


पाटील अभिजित
जिमनॅस्टिक


परीट विनायक
व्हॉलिबॉल


पाटील सागर
व्हॉलीबॉल


गोधडे अजित
व्हॉलीबॉल


माळवी धनाजी
कबड्डी


राणे वैभव
अॅथलॅटिक्स


मोरे अमोल
अॅथलॅटिक्स


पाटील रोशन
कराटे

## हार्दिक अभिनंदन

शिवाजी विद्यापीठाची
इंग्रजी विषयात
पी.एचडी. सपांदन


प्रा. डॉ. एस. ए. साळोखे

''लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाण तो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी''

– सुरेश भट

# मराठी विभाग

डॉ. संजय पाटील

# अनुक्रमणिका

## ■ गद्य विभाग ■


| | | |
|---|---|---|
| १) आई.... मी का मरतोय ? | कु. ऋतुजा रवींद्र चौगले | बी. एस्सी.-२ |
| २) स्त्री जन्मा ही तुझी कहाणी | कु. प्रियांका नामदेव गोडसे | बी. एस्सी.-१ |
| ३) स्पर्धा परीक्षेतील यशाचा मार्ग | सुनिल कृष्णात मांडवकर | बी. ए.-३ |
| ४) नातं - गुरू आणि शिष्याचं | विकास पाटील | बी. ए.-३ |
| ५) एन. एस. एस. शिबीर - भावी जीवनाची शिदोरी | कु. प्रियांका बाळासो फराकटे | बी. ए.-३ |
| ६) निखळ मैत्री | कु. माया भिमराव कांबळे | बी. एस्सी.-२ |
| ७) शेतकऱ्यांच्या संकटाचा मार्ग आत्महत्याच आहे का ? | नेताजी साताप्पा ढेरे | |
| ८) एक आव्हान पाण्याचे | कु. पूजा बाळासो फराकटे | बी. ए.-२ |
| ९) गोष्ट एका लढाऊ मित्राची | कु. धनश्री पांडुरंग वागवेकर | बी. एस्सी.-२ |
| १०) नव्या जगाचा शोधक - ख्रिस्तोफर कोलंबस | कु. संजीवनी रामदास पाटील | बी. एस्सी.-३ |
| ११) उत्साही जीवन | कु. पूजा धनाजी चौगले | बी. ए.-१ |
| १२) असा माझा गाव | मोरेश्वर दत्तात्रय अस्वले | बी. ए.-२ |
| १३) थोर कवी - आरती प्रभू | प्रवीण आनंदा पाटील | बी. ए.-३ |
| १४)स्पर्श | सुरेश गोपाळ कांबळे | बी. एस्सी.-३ |
| १५) प्रेम आणि भावना | कु. शुभांगी प्रभाकर कोरे | बी. ए.-२ |
| १६) हीच आमची वेळ | दीपक तानाजी कांबळे | बी. एस्सी.-३ |
| १७) मनाच्या कोपऱ्यातून | कु. श्वेता साताप्पा पाटील | बी. एस्सी.-२ |


## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) स्त्री भ्रूणहत्या | कु. प्रियांका दत्तात्रय देसाई | बी. ए.-२ |
| २) बाप | कु. सुप्रिया शहाजी संकपाळ | बी. ए.-२ |
| ३)आई | कु. पूनम रंगराव पाटील | बी.ए.-३ |
| ४)आई | कु. निलम राजाराम पाटील | बी. ए.-३ |
| ५) जीवनाची लढाई | कु. रोहिणी मुरलीधर गावकर | बी. ए.-३ |
| ६) आई | कु. स्वाती शिवाजी भोईटे | बी. ए.-३ |
| ७) माझी माय | कु. अनुराधा भिमराव कुंभार | बी. एस्सी.-३ |
| ८) अडाणी पण जिद्दी माय | कु. प्रणिता जयसिंग पाटील | बी. एस्सी.-२ |

| | | |
|---|---|---|
| ९) मुलगीचा अभिमान | कु. स्वप्नाली सुरेश पाटील | बी. एस्सी.-३ |
| १०) काहीतरी चुकत गेले | संतोष आडसुळे | बी. एस्सी.-३ |
| ११) पुस्तकं | माणिक सुभाष पाटील | बी. एस्सी.-३ |
| १२) मन उदास होताना | दीपक राजाराम पोवार | बी. एस्सी.-३ |
| १३) ध्येय वेड | निवास नामदेव जाधव | बी. ए.-१ |
| १४) माझे महाविद्यालय | कु. विद्या संजय पाटील | बी. ए.-३ |
| १५) एक आठवणीचा क्षण | कु. अंकिता अनिल देवर्डेकर | बी. ए.-१ |
| १६) असेही जगून बघा | कु. विजया शीतल तिरवडे | बी. एस्सी.-३ |
| १७) प्रेमी युगुल | राजवर्धन नंदकुमार केसरकर | बी. एस्सी.-३ |
| १८) मनातली गोष्ट | वैभव कांबळे | बी. ए.-१ |
| १९) इच्छा ! | अमर आबासो पाटील | बी. एस्सी.-३ |
| २०) मैत्री कशी असावी | कु. करिश्मा पाटील | बी. ए.-३ |
| २१) मी म्हटलं : बरं ! | कु. प्राजक्ता रामचंद्र शिंदे | बी. ए.-२ |
| २२) जीवन | आदिनाथ शामराव मस्कर | बी. एस्सी.-१ |
| २३) पहिला पाऊस | विनायक शंकर कुंभार | बी. एस्सी.-१ |
| २४) प्रेम | समीर मारुती कांबळे | बी. ए.-१ |
| २५) मन | रणजित दि. गायकवाड | बी. ए.-१ |
| २६) आठवण येताच | संतोष शिवाजी जितकर | बी. ए.-३ |
| २७) मैत्री म्हणजे | सुनिल गजानन पाटील | बी. ए.-२ |
| २८) प्रेम | विकास तुकाराम कांबळे | -१ |

## इतर

| | | |
|---|---|---|
| १) भावाने बहिणीला लिहिलेलं पत्र | कु. सुरेशा मधुकर पाटील | बी. ए.-१ |
| २) हास्य विनोद | अजय कृष्णात तौंदकर | बी. एस्सी.-२ |
| ३) जीवन जगण्याचा मूलमंत्र | कु. प्रियांका राजेंद्र सावंत | बी. एस्सी-३ |
| ४) निमत्रंण | गणेश दिनकर हिंगे | बी. एस्सी.-३ |

# आई......
# मी का मरतोय......

- कु. ऋतुजा रवींद्र चौगले

'थर्टी फस्ट'चा बेभान जल्लोष.....

आई

तू म्हणाली होतीस.

पार्टीला जायचंय, तर जा.....

पण 'पिऊ' नकोस.....!

आई.

खरं सांगतो..... मी नाही प्यायलो..... मी फक्त सॉफ्टड्रिंक प्यायलो..... सोडा असलेला.....!

आई,

खूप आग्रह केला मित्रांनी..... म्हणाले पी रे..... पी रे.....पण नाही प्यायलो मी..... संगळ्यांनी चिडवलं मला, भरीस पाडलं; पण मी नाहीच ग्लासला हात लावला..... तुला दिलेलं प्रॉमिस पाळलं..... न पिण्याचं.....!

कोणी काहीही म्हणो..... न पिता एन्जॉय करता येतो, हे तुझं वाक्य माझ्या लक्षात होतं..... मला गरजच नाही वाटली नशेची.....!

आई,

पार्टी संपत आली आत्ता..... जो तो घराकडे निघालाय ..... खूप पिऊन 'टाईट' झालेले माझे मित्र स्वतः ड्राईव्ह करत घराकडे निघालेत..... मी ही माझ्या कारजवळ पोहोचलोय..... निघालोय..... पूर्ण शुद्धीत.....! मी येईन घरी धडधाकट ..... नशेत गाडी ठोकरण्याचां, काही होण्याचा प्रश्नच नाही ..... मी प्यालोच नाही.....

आई,

मी निघालो.....

गाडी काढताच होतो बाहेर; पण पाहतो, तर समोरून एक गाडी सुसाट येताना दिसते ..... माझ्याजवळ अगदी जवळ येतेय ती ..... माझ्या गाडीवर ..... आदळतेय .....

आई,

मी पडलोय गाडीबाहेर ..... काहीच कळत नाहीये ..... अंगातून कारंजं फुटल्यासारखं उडतंय ..... कोणीतरी हवालदार ओरडतोय जोरजोरात ..... दारू पिऊन बुंगरट गाडी चालवत होती ती पोरं ..... त्यांच्या गाडीनं ठोकरलं याला ..... मरणार हे पोरगं .....

आई,

मला वेदना होताहेत गं खूप ..... तू जवळ असावीस असं वाटतय ..... मी ..... मी ..... ?

आई .....

मला का ठोकरलं गं त्यांनी? रक्ताच्या थारोळ्यात पडलोय मी.....जमलेत इथे सगळे पण.....डॉक्टर, पोलीस..... ते डॉक्टर म्हणताहेत..... काही चान्सेस नाही. संपलंय सारे, काहीच उपाय नाही..... नाही वाचणार हा.....

आई,

तुझी शपथ..... मी प्यायलो नव्हतो गं..... त्या गाडीतली मुलं नशेत होती .....

आई,

ती मुलंही माझ्याबरोबरच त्या पार्टीत होती बहुतेक फरक इतकाच ..... की प्यायले ते आणि मरतोय मी ..... ! का पितात गं आई ही लोकं? सगळं आयुष्य नासवतात स्वतःच ..... आणि दुसऱ्याचही .....

आई,

माझ्यासारखंच त्यालाही कुणीतरी सांगायला हवं होतं ..... दारू पिऊन गाडी चालवू नकोस ..... त्यानं ते ऐकलं असेल .....

आई,

मला आता श्वास लागायला लागलाय ..... तुटायला लागलोय मी अख्खा ..... आतल्या आत ..... पण तू नाही रडायचंस माझ्यासाठी ..... मला जेव्हा तुझी गरज होती ..... तेव्हा तेव्हा तू माझ्याबरोबर ..... माझ्यासाठी ..... !

पण मरताना मला फक्त एक शेवटचा प्रश्न पडलाय ..... जर मी दारू पिऊन गाडी चालवत नव्हतो, तर मग मी का मरायचं? दुसऱ्याच्या चुकीची शिक्षा मीच का भोगायची?

आई ..... का लोक दारू पिऊन गाडी चालवतात गं ..... ?

▲▲▲

## स्त्री भ्रूणहत्या

मी जत्रेतलं खेळणं नाही आई<br>
मोडलं की फेकून द्यायला<br>
तुझ्या काळजाचं स्पंदन आहे<br>
हे सांगावं लागतय तुला<br>
बोबडं बोल माझं अंगणी फुलू दे<br>
आई मला उमलू दे<br>
आई मला उमलू दे....!

ताईच्या मांडीवर खेळायचं आहे मला<br>
दादाच्या हातावर राखी बांधायची आहे मला<br>
आजोबांना बोबड्या स्वरातील गोष्ट सांगायची आहे<br>
तुझ्या मंजुळ स्वरातील अंगाई गीत मला ऐकू दे<br>
आई मला उमलू दे<br>
आई मला उमलू दे....!

मुक्ताई, जिजाई, अहिल्या, सावित्री<br>
यांनी देशाचा इतिहास घडविला<br>
ज्या जिजाऊच्या शिवबाने मग<br>
सह्याद्रीच्या मातीत किती पराक्रम फुलविला<br>
त्या शिवबाचे स्वराज्य मला पाहू दे<br>
आई मला उमलू दे<br>
आई मला उमलू दे....!

– देसाई प्रियांका दत्तात्रय

# स्त्री जन्मा ही तुझी कहाणी..

कु. प्रियांका नामदेव गोडसे
बी. एस्सी. भाग-१

स्त्री म्हणजेच माता, आई, ममता, माय, माउली, बहीण, बायको आजी इत्यादी अशी अगणित रूपे असलेली देवी....

इतके सुंदर रूप, नाती व घर जोडणारा एक दुवा म्हणजेच स्त्री. इतकं असूनही आजच्या जगात लोकांना मुली नको आहेत. का नको आम्ही तुम्हांला? का कोणता गुन्हा केलाय आम्ही? म्हणून आम्हाला जन्माला येण्याआधी मारलं जातय. अहो! गुन्हेगारांनासुद्धा इतकी अघोरी शिक्षा दिली जात नाही, जी आम्हाला मिळते. का? तर आम्ही मुली म्हणून !...

स्त्री म्हणजे या जगाची, घराची, नात्याची सुरुवात. जिच्यापासून नाती सुरू होतात व ती तिच्यापाशीच येऊन थांबतात.

या जगात अनेक महान स्त्रिया होऊन गेल्या आणि आजही होतायत. त्या शरीराने गेल्या; पण त्यांचे संस्कार, संस्कृती आणि ज्ञान आमच्यात देऊन गेल्या. किती नावं घेऊ? आणि कुणाकुणाची किती उदाहरण देऊ? सांगा या स्त्रियाची अगदी जिजामाता राणीसाहेब, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, हिरकणी किरण बेदी, इंदिरा गांधी, मेधा पाटकर, डॉ. आपटेमाई त्याचबरोबर आपल्या महिला खेळाडू पी. टी. उषा, मेरी कॉम, तेजस्विनी सावंत अशा खेळाडू महिलांनी भारताचं, जगाचं आणि घराचे नाव अटकेपार नेलं. समाजात स्वतःचं स्थान निर्माण केलं. एक सन्मान मिळाला. या ज्ञानी युगात मात्र या स्त्रीला अजूनही 'रांधा वाढा, उष्टी काढा.' याच नजरेतून पाहिले जातंय. स्त्रीला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करता यावं, म्हणून समाजानं, सरकारनं योजना दिल्या; पण त्याही फक्त कागदावरच. महिलांच्या सुरक्षतेचा प्रश्न उचलला; पण तो फक्त लोकसभेत. इतर ठिकाणी जे आहे ते आहेच.

'गर्भपात' हे संकट काय कमी होतं? आमच्यासाठी म्हणून आता आम्हांला तुमच्या वासनेच्या नजरेला बळी पाडताय काय ? एखादी मुलगी शिकते व नंतर घराला हातभार लागावा म्हणून काम करते, तर तिला तिथे तिचा सन्मान मिळत नाहीच; पण तुमच्या वासनेला बळी पडावं लागतं. का? अहो! मी लिहिते मुलगी म्हणून नाही, तर या सर्वच मुलींची एक भावना म्हणून.... दिल्लीत आलेले संकट आजही आठवलं तरी अंगावर काटा येतो. नंतर मुंबईतील इंदू मिलमधील ती घटना. अहो, तुमची वासना तर चार, तीन, दोन इतकंच नव्हे तर एक वर्षाच्या त्या छोट्या निष्पाप जीवांना पण सोटत नाही. अहो, ज्या वयात मुलीने खेळात आपला आत्मविश्वास वाढवायचा, त्या वेळेत तिला या नराधमांच्या सामोरे जावे लागते. का? कोण उत्तर देईल का, या प्रश्नाचं. त्या मुलींना आम्हा सर्वांना, या स्त्री जातीला दिले का हो?

त्यात भर म्हणजे तुमचा हव्यास, लोभ, लग्न हे प्रत्येक मुलीसाठी स्वर्गाहून सुंदर स्वप्न असते; पण त्या वाटेत एक काटा रुततो, तो म्हणजेच हुंड्यांचा. आपण हुंडा समोरासमोर नाही; पण कोणत्यातरी गोष्टीच्या आडून घेतला जातो. मग ते लग्न करून द्या किंवा सोफासेट, फ्रीज, टीव्ही अशा अनेक स्वरूपात घेतला जातो. का हवा लोभ तुम्हाला? दुसऱ्याकडून हुंडा घेताना तुम्हांला जाणवत नाही का तुम्हालांही एक 'कन्यारत्न' आहे? उद्या तीही या प्रसंगातून जाणार आहे? थोडा विचार करा या सगळ्याचा. मग हे प्रश्न आम्हांला पडणारच नाहीत ना. आज आम्हांलाही स्वप्नं पडतात; पण ती सुंदर संसाराची नाही तर उद्या यातील एखादी घटना आमच्यासोबत न होओ.

थोडा विचार करा.... सगळं कोडं सुटल आणि स्वर्गाहूनही सुंदर हे जग होऊन जाईल. काय माहीत, गुन्हेगारीही कमी होईल.

विचार करा.
कोण होतास तू, काय झालास तू.
अरे वेड्या, कुठे वाया गेलास तू...
मग
द्याल ना आम्हांला साथ
द्याल ना आम्हांला सन्मान
आणि ताठ मानेनं जगाचा
आणि जगायचा अधिकार....
द्याल ना?

।। धन्यवाद ।।

# आई

आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आईवरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्त्व मोठे
जीवन हे शेत, तर आई म्हणजे विहीर
जीवन ही नौका, तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा, तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम, तर आई म्हणजे सुट्टी
आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातली छत्री
आई तू थंडीतील शाल
आता यावीत दुःखे खुशाल.

– कु. स्वाती शिवाजी भोईटे
T. Y. B. A.



# ''स्पर्धा परीक्षेतील यशाचा मार्ग''

- सुनिल कृष्णात मांडवकर
बी. ए. भाग ३ (राज्यशास्त्र)

''स्पर्धा परीक्षेला लाखो विद्यार्थी बसतात; पण निवड हजार जणांचीच होते. यावरून असे स्पष्ट होते, की परीक्षा कठीण असते. तथापि या परीक्षेत यश मिळविणे कठीण मात्र जरूर नाही. खालील नमुद बाबींचे मनापासून तंतोतंत पालन केल्यास यश निश्चितपणे मिळू शकते.''

**प्रवृत्ती :-(Attitude) दृष्टिकोण**

या स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने त्याची प्रवृत्ती, मानसिकता सकारात्मक ठेवली पाहिजे. सकारात्मक प्रवृत्ती याचा अर्थ स्पर्धा जिंकण्याची प्रवृत्ती होय. मी या स्पर्धेत यशस्वी होणारच. अशा प्रकारची मानसिकता आणि दृढ निर्धार करून या परीक्षेला सामोरे गेल्यास यश मिळणे फारसे अवघड नाही.

या स्पर्धा परीक्षेबाबत अनेक प्रकारचे अपप्रचार केले जातात; परंतु त्यामध्ये काही तथ्य नसते. या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून केवळ गुणवत्ता या निकषावर उमदेवारांची अंतिमतः निवड केली जाते.

**निर्धार :-**

केवळ सकारात्मक प्रवृत्ती असणे पुरेसी नाही. या सोबत दृढ निर्धार याचा अर्थ एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न हवेत.

**कौशल्य आणि कार्यपद्धती :** (Skill and System)

कोणतीही स्पर्धा जिंकण्यासाठी कौशल्य ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. प्रबळ इच्छाशक्ती आणि त्यासोबत पुरेसे ज्ञान असूनही कौशल्य नसेल, तर यश मिळविणे कठीण आहे. यामध्ये अभ्यास करण्याचे कौशल्य, प्रश्नांची उत्तरे लिहिण्याचे कौशल्य इत्यादी सर्व बाबींचा समावेश होतो. यासोबतच अभ्यासाची कार्यपद्धती ही बाबसुद्धा फार महत्त्वाची असते. एखादे काम करण्याची कार्यपद्धती चुकीची असेल, तर काम करण्यास विलंब लागतो आणि बऱ्याचदा योग्यप्रकारे काम होत नाही. ज्या विद्यार्थ्यांना एम. पी. एस. सी.च्या स्पर्धा परीक्षेला सामोरे जावयाचे आहे, त्यांनी अभ्यास करण्याची शास्त्रशुद्ध पद्धती आत्मसात करणे गरजेचे आहे. अभ्यासातील नियमितपणा आणि सातत्य या दोन्ही बाबीं कार्यपद्धतीचा अविभाज्य घटक आहेत.

हे ज्ञानाचे युग आहे, त्यामुळे ज्या व्यक्तीकडे पुरेसे ज्ञान नसेल, ती व्यक्ती कोणत्याही उपक्रमात यशस्वी होऊ शकत नाही.

**संयम :-**

बऱ्याचदा असे दिसून येते, की पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यानंतर बरेच उमेदवार नाउमेद होऊन प्रयत्न करणे थांबवतात व स्पर्धा परीक्षेतून बाहेर पडतात. यामुळे पहिल्या प्रयत्नात आलेल्या अपयशाकडे अपयश म्हणून न बघता यशाकडे जाण्याच्या मार्गातील तो टप्पा आहे, असे समजून

प्रयत्न करीत राहणे गरजेचे आहे.

**नियोजनबद्ध कामकाजप्रणाली :–**

अभ्यासाची पुस्तके आणि काढलेल्या नोटस योग्य ठिकाणी आणि योग्य पद्धतीने ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा त्यांचा शोध घेण्याकरिता बराच वेळ खर्ची जातो आणि आवश्यक वस्तू वेळेवर सापडली नाही, तर स्वभाव चिडखोर बनतो. चिडखोर स्वभावाच्या व्यक्तीमध्ये मनाची एकाग्रता निर्माण होऊ शकत नाही. वेळेच्या बचतीसाठी उपलब्ध वेळेचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. यासाठी आवश्यक आहे नियोजनबद्ध कामकाजप्रणाली.

**दर्जेदार पुस्तके :–**

परीक्षेची तयारी करण्याकरिता उपलब्ध असणारा मर्यादित कालावधी विचारात घेता प्रत्येक विषयाची फार अधिक पुस्तके न वाचता तीन किंवा चार दर्जेदार पुस्तकेच वाचावीत व प्रत्येक पुस्तकातील काही महत्त्वाच्या बाबींची नोंद केली जावी. सर्वच पुस्तकांमध्ये बऱ्याच बाबी समान असतात.

**तणावमुक्त मानसिकता :–**

तणावपूर्ण मनःस्थितीत केलेला अभ्याससुद्धा लक्षात राहत नाही, त्यामुळे उमेदवारांनी आपल्या मनावर कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण होऊ न देता अभ्यास करणे गरजेचे आहे. मी या परीक्षेत उत्तीर्ण होईल किंवा नाही या बाबींचा विचार वारंवार न करता जितका जास्त अभ्यास करता येईल, तितका करावा.

**आरोग्य :– (Helth)**

निरोगी शरीर हा कठोर परिश्रमाचा पाया आहे. शरीर निरोगी नसेल, तर अभ्यासात मन लागत नाही. लवकर थकवा येतो, तसेच केलेला अभ्यास लक्षात राहत नाही. आरोग्य आणि स्मरणशक्तीचा सरळ संबंध आहे, त्यामुळे कठीण परिश्रमाबरोबरच आरोग्याकडेसुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे. याकरिता दररोज कमीत कमी एक तास व्यायाम करावा. तसेच नियमितपणे सकाळी फिरावयास जावे. मसाल्याचे पदार्थ खाऊ नयेत.

**चर्चा आणि विचारांची देवाणघेवाण :–**

(Discussions and Interaction)

गटचर्चा आणि विचारांची देवाणघेवाण या माध्यमातून कमी वेळेत अधिक ज्ञान प्राप्त करणे शक्य होते. तसेच त्यामुळे स्वतःचा आत्मविश्वास निर्माण होतो. इतरांनी सांगितलेली माहिती लवकर लक्षात राहते.

**शॉर्टफॉर्म्स महत्त्व :–**

एखाद्या विषयात अनेक महत्त्वाचे मुद्दे असतात. ते सर्व लक्षात ठेवले पाहिजेत. याकरिता काही शॉर्टफॉर्म तयार केल्यास त्याचा फायदा होतो.

उदाहरणार्थ :– 'बिरारू' राज्ये. बिमारूचा अर्थ बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान आणि उत्तरप्रदेश. ही राज्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या बिमार (आजारी) आहेत.

BRIC म्हणजे ब्राझील, रशिया, इंडिया आणि चीन लक्षात राहतील.

अशाप्रकारे शॉर्टफॉर्म तयार करण्याचा प्रयत्न

करावा.

**अभ्यासाचा कालावधी :-**

अ) या स्पर्धा परीक्षेची तयारी कमीत कमी एक वर्ष करावी लागते. साधारण गुणवत्तेच्य उमेदवाराच्या बाबतीत हा कालावधी १-२ वर्षाचा असू शकतो.

ब) परीक्षेची परिपूर्ण तयारी करण्याकरिता दररोज साधारण १०-१२ तास अभ्यास करणे अपेक्षित आहे. शेवटच्या तीन महिन्यात हा कालावधी १५-१६ तास असू शकतो.

**अभ्यासाचे वेळापत्रक :-**

सतत केलेला अभ्यास लक्षात राहण्याचे प्रमाण हळूहळू कमी होत जाते. 'लॉ ऑफ डिनीनिसिंग रिटर्न'चा सिद्धांत या ठिकाणीही लागू होतो, त्यामुळे अभ्यास टप्याटप्याने केल्यास तो अधिक स्मरणात राहतो.

अभ्यासाचे वेळापत्रक खालील पाच टप्प्यात विभागले जाऊ शकते.

**१) पहाटे ०५ : ०० ते ०७ : ३०**

**२) सकाळी ०९ : ०० ते १२ : ००**

**३) दुपारी ०२ : ०० ते ०५ : ३०**

**४) सायंकाळी ०७ :०० ते ०९ : ००**

**५) रात्री १० : ०० ते ११ : ००**

# आई

आई वडील माझे थोर किती सांगू त्यांचे उपकार,
जीवनाच्या वाटेवरती किता असतो त्यांचा आधार
आई माझी मायेचा सागर
दिला तिने जीवनाला आधार
रखरखत्या ऊनातून धगधगत्या रानातून
राबलीस माझ्यासाठी तू गं ! कष्टाच्या घामातून
कधी मिळेल मुठभर घास, कधी घडेल उपवास
ओल्या मातीतून चालताना तुडविले काट्याचे फास
आई माझी मायचे सागर दिला तिने जीवनाला आधार
नभीचे चांदणे तू चंद्राची कोर
शीतल तुझी छाया मला हवी जन्मभर
तुझ्या शीतल छायाखाली उभं आयुष्य मी काढीन
आई देवापाशी मी गं ? आई तुलाच मी मागीन
आई माझी मायेचा सागर दिला तिने जीवनाल आधार

**- पूनम (प्रीती) रंगराव पाटील**

बी. ए. भाग-३

# नातं - गुरू आणि शिष्याचं

- पाटील विकास
बी. ए. ३



उत्तम काम किंवा कार्य केल्याबद्दल आपण प्रशंसेचे जे चार शब्द बोलतो त्याला कौतुक असे म्हणतात. कौतुकामध्ये शब्द पुरेसे असतात; पण या कौतुकाला वस्तूची (बक्षीस) जोड मिळाली, तर कौतुकाची गोडी अधिक वाढते आणि हे गुरूंकडून झाले तर दुधात साखरच. कौतुकाचे चार शब्द संजीवनी आहेत. म्हणूनच,

क्षण एक पुरे कौतुकाचा । वर्षाव घडो कामाचा । असे काही म्हणावेसे वाटते.

असो, आपण विषयाकडे वळू. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची ही गोष्ट. न्या. रानडेंना आपण बंगाली भाषा शिकली पाहिजे आणि ती आपल्याला आली पाहिजे असं वाटलं; पण कामाच्या रगाड्यात बंगाली भाषा शिकायला त्यांना जमेना. मग एका बंगाली भाषिक नाभिकाला नेमले आणि दाढी करता करता त्याच्याकडून ते बंगाली भाषेचे धडे गिरवू लागले. एकेदिवशी हा प्रकार त्यांच्या पत्नीच्या लक्षात आला. त्या रागावल्या. म्हणाल्या, " काय हे? आपल्याला याच्यापेक्षा अधिक चांगला गुरू सहज मिळाला असता. आपण न्यायाधीश आहात. अशा पद्धतीने आपण शिकत आहात हे कुणी पाहिलं, तर तुम्हाला ते लोक काय म्हणतील?" तेव्हा न्या. रानडे म्हणाले, " आपल्याला जिथून ज्ञान मिळेल, तिथून आपण घेतलं पाहिजे. तू संकुचित विचार करू नकोस. तुला दत्तात्रेय माहिती आहेत काय? त्यांना चोवीस गुरू होते. प्राणी, पक्षी, किडे, माणसं अशा सर्वांनाच त्यांनी गुरू मानलं होतं.

ज्यांच्याकडे चांगले गुण आहेत, त्यांना आपण गुरू मानावं.

खरंच ही गोष्ट केवढा मोठा बोध देते ! आपल्या आजूबाजूला अनेक गोष्टी शिकण्यासारख्या

असतात; पण आपली दृष्टीच अतिशय संकुचित असते, त्यामुळे आपणच ज्ञानाची कवाडं बंद करतो.

कुणाकडून काय घ्यावे म्हणजेच शिकायला हवं, हे कवी वि. दा. करंदीकरांनी अतिशय सुंदर भाषेत आपल्या 'घेता' या कवितेत सांगितलं आहे.

निसर्ग हा सर्वश्रेष्ठ गुरू आहे, त्यांच्याबद्दल कितीही सांगितलं, तर अपुरंच आहे. ठरावीक वेळेला आकाशात उगवून अस्ताला जाणारे चंद्र, सूर्य, तारे आपल्याला नियमितपणा शिकवतात. वृक्ष, लता, मेघ, नदी, सागर आपल्याला परोपकार करायला शिकवतात आणि एक समर्पित जीवन जगण्याचा मार्ग दाखवितात.

आकाशाकडून विशालतेचा, डोंगर-पर्वताकडून धैर्यशीलतेचा गुण घ्यायला हवा. आपल्या आजूबाजूला असलेल्या लहानांपासून मोठ्यापर्यंत आपण काही ना काही शिकतच असतो आणि त्यामुळेच ते न कळत आपले गुरू होऊन जातात.

आपल्या आजूबाजूला असे अनेक गुरू असतात, की ज्यांच्याकडून आपल्याला सतत शिकायला मिळतं; पण हे नातं जोडण्यासाठी आपले डोळे उघडे असले पाहिजेत, मग ते गुरू आपल्याला दिगंतातून फिरवत विश्वाकार दाखवतात आणि अनंताचा साक्षात्कार घडवतात.

जीवनात चैतन्य आणणाऱ्या अशा या गुरूंना माझा सादर प्रणाम !

▲▲▲

## आई

आई म्हणजे चालते बोलते 'SATELITE'
प्रत्येक समस्येला तू सहज देते 'SITE'
राब राब राबतेस अगदी 'DAYNIGHT'
म्हणूनच येतो आमच्या आयुष्यात 'LIGHT'
आई तू म्हणजे...... 'REST HOUSE'
कॉम्प्युटरच........ 'MOUSE'
खरंच तुझ्याशिवाय आई
चालू शकत नाही कोणतेही 'HOUSE'
आई म्हणजे संगीतातील सतार
आकाशातील....... 'STAR'
तुझ्या असण्याने आई
घर ही बनतं अगदी 'FIVE STAR'
आई म्हणजे विश्वाचा 'LORD'
खेळायची 'YARD'
घराची 'GUARD'
पिलांसाठी 'BIRD'
विश्वकोशातही ही नाही आई
तुझ्यापेक्षा...... 'WORD'

– कु. निलम राजाराम पाटील
T. Y. B. A.

# एन. एस. एस.
## - भावी जीवनाची शिदोरी

- कु. प्रियांका बाळासो फराकटे
बी. ए. भाग - ३

'हम सब मिलकर देश का अपने जग में नाम जगायेंगे।
एन. एस. एस. का परछम लेकर आगे बढते जायेंगे।'

या एन. एस. एस. गीतानुसार भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी, प्रगतीपथावर पोहोचण्यासाठी एन. एस. एस. शिबिर अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला हिऱ्याप्रमाणे पैलू पाडण्याचे कार्य एन. एस. एस.शिबिर जिकिरीने करते. शिबिर करत असताना जीवनातील सत्यप्रत चांगले अनुभव मिळाले. असं वाटतं, की इथूनच भावी जीवनाची तयारी सुरू झाली. आपण म्हणतो त्या वास्तव जीवनामध्ये कसं जगावं याचे चांगलेच धडे मिळाले. एन. एस. एस. शिबिरामध्ये पहाटे योगासने, व्यायाम घेतले, त्यामुळे शरीर निरोगी राहण्यास आणि मन प्रसन्न होण्यास मदत झाली. इंग्रजीत जसे म्हणतात, की "Sound mind in sound body" आणि "Health is Wealth." त्याप्रमाणे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून शारीरिक, मानसिक तंदुरूस्ती बनण्यास मदत झाली. भावी जीवनासाठी शरीराची इमारत भक्कम असेल तरच इतर कार्ये पूर्णत्वाकडे नेण्यास आपण सक्षम होऊ, त्यामुळे एन. एस. एस. शिबिर ही भावी जीवनाच्या तयारीची सुरुवात आहे.

'वक्तशीरपणा' हा प्रत्येकाकडे असायला हवा. त्यासाठी वेळेचे नियोजन करता आले पाहिजे. शिबिरामध्ये सर्व स्वयंसेवकांना वेळेचे महत्त्व पटले. " Time is Money." याचा प्रत्यय आला, त्यामुळे वेळेचा अपव्यय होणार नाही याची दखल घेण्यास सर्वजण शिकले. वक्तशीरपणाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजण्यास मदत झाली. एन. एस. एस. शिबिरामध्ये शारीरिक कष्टाची कामे केली. खोरी, कुदळ, टिकाव, पार, झाडू यांसारख्या साहित्यांच्या साहाय्याने स्वयंसेवक-स्वयंसेविकांनी प्रत्यक्ष कामे केली, त्यामुळे कष्ट करून, घाम गाळून केलेल्या कामाचा गोड आनंद मनाला किती प्रसन्नता मिळवून देतो, हे समजलं. प्रत्यक्ष भावी जीवनात " Work is God and Pray. " ही लौकिक गोष्ट समजली.

सुरुवातीला एन. एस. एस. शिबिराच्या पहिल्याच दिवशी जनजागृती करण्यासाठी गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्या प्रभातफेरीमध्ये - 'माकडा माकडा हूप हूप, झाडे लावा खूप खूप', 'N. S. S., N. S. S. We want Success, ' 'Not me But you' 'पाणी अडवा, पाणी जिरवा.', 'लेक वाचवा, लेक शिकवा', 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत.' यांसारख्या घोषणा देण्यात आल्या. प्रभातफेरीमध्ये गावातील लोकांचे प्रबोधन केले.

शिबिरातील दररोजचे नियोजन हे काटेकोरपणे पाळले जायचे. सकाळच्या अल्पोपहारानंतर शारीरिक कामे केली. त्यामध्ये ग्राम स्वच्छता, नदी घाट स्वच्छता, गटारी स्वच्छता, दोन वनराई बंधारे, डोंगरातून जाणारा पालखीचा रस्ता,

गावातील मोरे गल्लीचा रस्ता तयार केला. डोंगरातील रस्ता तयार करताना सर्वच स्वयंसेवक-स्वयंसेविकांना खूप शारीरिक कष्ट घ्यावे लागले, त्रास झाला. अथक परिश्रमाने सुंदर असा रस्ता तयार केला. याठिकाणी 'एकी हेच बळ' त्याप्रमाणे सर्वांनी एकजुटीने हा रस्ता तयार केला. अशा सुंदर सृजनशीलतेनंतर मनाला आत्मिक समाधान लाभले.

शिबिरामध्ये शारीरिक कामाबरोबरच बौद्धिक खाद्यही सर्व विद्यार्थ्यांना पुरवले. दररोज दुपारच्या सत्रात 'गटचर्चा' या कार्यक्रमाचे आयोजन केले. गटचर्चेसाठी दररोजचे विषय ठरवले. त्यामध्ये 'प्रेम आणि मैत्री यांतील फरक', 'प्रसारमाध्यमाची गरज आणि वास्तव', 'भारत एक महाशक्तीशाली राष्ट्र : स्वप्न आणि वास्तव', 'खेड्यांचे बदलते स्वरूप', 'युवक : कालचा, आजचा आणि उद्याचा' यांसारखे बुद्धीला चालना देणारे विषय ठरविण्यात आले. प्रत्येक गटातून दोन-दोन विद्यार्थी व्यासपीठावर येऊन विषयाच्या सकारात्मक-नकारात्मक बाजू मांडत होते. त्यातून विचारांची देवाण-घेवाण होत होती. त्यातून प्रत्येकाला हक्काचं व्यासपीठ मिळालं. गटचर्चेनंतर चहापानाचा कार्यक्रम व्हायचा. त्यानंतर संध्याकाळच्या व्याख्यानाची तयारी सुरू व्हायची. रांगोळी घालणे, व्यासपीठ सजवणे, गावातून लोकांना व्याख्यान ऐकण्यास येण्यासाठी बोलावून आणणे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणे, पाहुण्यांचे स्वागत करण्याची तयारी करणे यांसारखी जबाबदारी पूर्णपणे स्वयंसेवकांवर असल्याने जो-तो गट आपापल्या क्रमाने ही जबाबदारी पार पाडत असे. हे करीत असताना प्रत्यक्ष जीवनात 'नायक' म्हणून कार्यरत असताना किती धडपड करावी लागते, याची प्रचिती आली.

बौद्धिक चालना देणारी व्याख्याने खरोखरच उत्कृष्ट झाली प्रा. शिवाजीराव भुकेले यांनी 'तुका झालासे कळस' या विषयावरील प्रबोधनात्मक व्याख्यान अतिशय विनोदात्मक रीतीने दिले. सर्व स्वयंसेवक-स्वयंसेविका, ग्रामस्थ व्याख्यान ऐकण्यात अगदी मग्न झाले. त्यांनी तुकाराम महाराजांच्या जीवनातील घटना सुंदररित्या अभंगाद्वारे सांगितल्या आणि सर्वांना अंतर्मुख केले. त्यांनी सांगितले, की

"राजा असावा शिबवासारखा
संत असावा तुकोबांसारखा."

तसेच तुकोबा म्हणजे मध्ययुगातील महात्मा फुले होय. तुकोबांची गाथा म्हणजे महाराष्ट्राचे ऊर्जास्रोत, महावस्त्र होय, असे मौलिक मार्गदर्शन केले.

मा. रवींद्र पाटील यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या अत्यंत पैलूदार विषयावर मार्गदर्शन केले. 'वक्तशीरपणा', 'सौजन्यशीलता', 'नम्रता', स्त्री-पुरुष समानता', 'श्रमप्रतिष्ठा' यांसारख्या मूल्यांचे महत्त्व उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. ABCD.....Z चे अर्थ व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना नाविण्यपूर्ण दृष्टिकोण मिळाला.

मा. राजेंद्र यादव यानी 'बुवाबाजीचे चमत्कार' अशा समाजप्रबोधनपर विषयावर प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग घेऊन बुवाबाजीचे चमत्कार दाखवले

समाज भोंदूपणाला कसा बळी पडतो, हे त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या व्याख्यानातून समस्त ग्रामस्थदेखील भारावून गेले.

मा. डॉ. विजय पेटकर यांनी 'स्वप्न' विषयावर तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन केले. स्वप्न मोठी पहा. जी झोपू देत नाहीत, तीच खरी स्वप्ने असतात, तर जी स्वप्ने झोपल्यानंतर पडतात, ती 'दिवास्वप्न' असतात, असे त्यांनी सांगितले. जीवनात यशस्वी होण्यासाठी टप्पे सांगितले याशिवाय डॉ. एम. एस. पाटील यांचे 'कुष्ठरोग निर्मूलन', डॉ. आर. एस. पाटील यांचे 'एड्स निर्मूलन', डॉ. एस. पी. जाधव यांचे 'मलेरिया व डेंग्यू डासांचे निर्मूलन' या विषयावर व्याख्याने झाली. ही व्याख्याने आरोग्यविषयक जागृती करणारी होती.

एन. एस. एस. शिबिरामध्ये महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ, महिला मेळावा व आरोग्य तपासणी हा संयुक्त कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात डॉ. स्नेहा हुंदरेमॅडम यांना महिलांच्या समस्या, त्यांचे प्रश्न जाणून घेऊन योग्यप्रकारे मार्गदर्शन केले. सर्वात महत्त्वाचं लक्षवेधी एन. एस. एस. शिबिराचं खास आकर्षण म्हणजेच स्वयंसेवक-स्वयंसेविकांचा 'विविध कलागुण दर्शन' कार्यक्रम होय. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध सुप्त गुणांचे दर्शन याठिकाणी झाले. अतिशय उत्साहात, उत्स्फूर्त सहभागातून हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनी अपेक्षापेक्षा अधिक दमदार हजेरी लावली आणि उदंड प्रतिसाद दिला. गोकुळ दूध संघाचे डॉ. साळुंखे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने शिबिराच्या शेवटच्या दिवशी 'पशुचिकित्सा शिबिर' आयोजित करण्यात आले. तसेच अग्निशामक बंबाच्या साहाय्याने नदीघाटाची स्वच्छता केली. सात दिवसांच्या शिबिरामध्ये आमची ज्ञानाची, अनुभवाची, स्वावलंबनाची, आनंदाची झोळी पुरेपूर भरली. या शिबिरामध्ये जोडलेल्या धाग्यांमधून बाजूला होणे अवघडच झाले होते. गावाशी आमचं एक नातं निर्माण झालं होतं. हे नातं सोडून, गाव सोडून आपापल्या घरी परतायचं, ही कल्पनाच सर्वांना सहन होत नव्हती. समारोपाच्या कार्यक्रमादिवशी मा. नामदेवराजी भोईटेसो, मा. विजयसिंह मोरेसो, सरपंच प्रा. वाय. एस. पाटील उपस्थित होते. त्यांनी देखील विद्यार्थ्यांना जीवनातील एन. एस. एस. चे महत्त्व पटवून दिले. तसेच भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. समारोप कार्यक्रमानंतर सर्वच स्वयंसेवक-स्वयंसेविकांना गहिवरून आले. एन. एस. एस. शिबिराची ही शिदोरी घेऊन जाताना आनंदही होत होता आणि तिथून दूर जाण्याचं दुःखही होत होतं.

असं हे एन. एस. एस. भावी जीवनात पुढचं पाऊल टाकण्यास मदत करणारं, प्रगतीची पायरी चढण्याचं धैर्य देणारं, व्यक्तिमत्त्वास विविध पैलू पाडणारं, भावी जीवनाची तयारी करणारं ठरलं. असे एन. एस. एस. करण्याचं भाग्य प्रत्येकाला लाभो हीच सदिच्छा ! जाता जाता मी एवढेच म्हणेन, -

"इथून दूर जाताना, मनात वादळ उठलेलं,
इथल्या साऱ्या आठवणींचं, उभं रान पेटलेलं.

इथून दूर जाताना, खूप काही दाटून येतं,

आठवणीच्या प्रवाहात मन, बर्फासारखं गोठून जातं.''

आमच्या या भावी जीवनाचा भक्कम पाया घालणारे एन. एस. एस. प्रकल्पाधिकारी गुरुवर्य प्रा. डॉ. संजय पाटील आणि त्यांचे सर्व सहकारी प्राध्यापक यांच्याविषयी आम्ही सर्व कृतज्ञता व्यक्त करतो. एन. एस. एस. च्या या श्रमसंस्कार शिबिरामुळे आमच्यामध्ये वक्तृत्व, नेतृत्व, दातृत्त्व आणि कर्तृत्त्व या व्यक्तिमत्त्व विकासाच्या कौशल्याची भर पडली, म्हणूनच मी म्हणते, की ''एन. एस. एस. शिबिर म्हणजे भावी जीवनाची शिदोरी असते.''




– दयानंद विष्णू डाफळे
बी. एस्सी. ३

## जीवनाची लढाई

फुलाने अपेक्षा केली का कधी,
काट्याकडून आधाराची.
जमिनीने कधी वाट पाहिली,
का आभाळाच्या सावलीची.
किनाऱ्याला वाटली का कधी भीती,
समुद्राच्या पाण्याची.
कधी वाऱ्याने संगत धरली का,
शेवटपर्यंत पाचोळ्याची.
अशीच लढाई आहे आपल्या जीवनाची
फक्त ती आपल्यालाच आहे जिंकायची !

– कु. रोहिणी मुरलीधर गावकर
T. Y. B. A.

## मुलगीचा अभिमान

मुलगा–मुलगी एक समान
दोघांनाही हक्क आणि अधिकार समान
मग, मुलग्याबरोबर मुलगी ती वाढवेल
आईवडिलांचा मान–सन्मान
बनवून यशस्वी आपले जीवन
इतरांचे ही बनवेल आयुष्य छान
बघा एक संधी देऊन
वाढवेल ती देशाचा
गौरव अन् अभिमान......

– पाटील स्वप्नाली सुरेश
बी. एस्सी. –३

# निखळ मैत्री...

- कु. माया भिमराय कांबळे
बी. एस्सी.-२.

आयुष्य सुंदर क्षणांनी विणत असताना अनेक नात्यांचे धागे जुळत असतात. यातील काही धागे माणसाला त्याच्या जन्माबरोबर लागतात, तर काही धागे आयुष्य जगताना प्रत्येक वळणावर गवसतात. त्यातीलच एक धागा 'मैत्री' होय.

खरंच या धाग्याशिवाय आयुष्य अपूर्णच. मैत्री एक अलवार भावना जिची रूपे अनेक. बालपणातील मैत्री, तरुणाईतील मैत्री, प्रौढत्वात परिपक्व झालेली मैत्री, उतारवयात एकमेकांची सुख-दुःखे जाणून घेणारी मैत्री, असे मैत्रीचे रंग अनेक. ती असते फुलपाखरासारखी स्वैर अन् स्वच्छंदी निर्झरासारखी खळाळणारी, सरितेसारखी शांत, संयमी वाहणारी, सागरासारखे उत्कट होऊन पालवणारे, तर कधी आकाशासारखे मायेचे पाखर घालणारे, तर कधी कृष्ण-सुदाम्यासारखे सर्व अंतर पार करून जाणारे असते.

मैत्री कोणाशीही असावी, मात्र ती निरपेक्ष असावी. मैत्री व्यक्तींनी व्यक्तीशी करावी, तशीच निसर्गाशीही करावी, विविध कलांशी करावी. ग्रंथाशी करावी. मैत्री कोणाशीही करावी, मात्र काही वेळा स्वतःहून पुढे येणारा मैत्रीचा हात हृदयाच्या अंतहृदयात सदोदीत स्नेहभाव टिकवेल हे मात्र शाश्वत नाही. अशा हातांच्या मागे काही वेळा स्वार्थ दडला जातो. तो स्वार्थ पूर्ण होताच मैत्री संपते. त्यांच्या विचारात मतभेद निर्माण होतात आणि एक मतभेद कायमचा भेद निर्माण करतो.

मैत्री म्हणजे रोज भेटणं नव्हे. मैत्री म्हणजे एकमेकांना फक्त भेटवस्तू देणं नव्हे. मैत्रीत नसतात आश्वासनं अटी-तटी कसलेच नियम आणि कसलेच बंध. मैत्री ही केवळ मैत्रीच असते. यामध्ये फक्त स्वभाव जुळलेले असतात. विचार जुळेलेले असतात. परस्पर स्नेह आदरभाव असतो. एकमेकांच्या गुणदोषासह एकमेकांना स्वीकारणं हे केवळ मैत्रीतच घडतं. मैत्रीत श्रद्धा असते. विश्वास असतो. खऱ्याखुऱ्या मैत्रीत समाजाने निर्माण केलेले जात-धर्म, स्त्री-पुरुष असे कोणतेच बंध प्रमाण ठरत नाही. खरी मैत्री हा व्यक्तीचा खरा अलंकार आहे. तो ज्याला लाभतो तो भाग्यवानच....

एकमेकांकडे जाणं -येणं होत नाही, म्हणून काही मैत्रभाव कमी होत नाही. दीर्घकाळाने गाठीभेटी झाल्या, तरी मनातून आनंदाचे कारंजे नाचायला लागतात. मैत्रीत मिळणारे आनंदाचे क्षण पुन्हा-पुन्हा हवेहवेसे वाटतात. मैत्री नावाची शिदोरी जरी आपण शरीराने दरावतो, तरी पुढे कितीतरी आनंदीत राहते.

मैत्री हे टॉनिक आहे. मरगळलेल्या मनाला प्रसन्नता देणारे ते एक ग्लूकोज आहे. जीवनात सर्व भौतिक सुख मिळवताना खरीखुरी मैत्री, निखळ मैत्री हे तितकच महत्त्वाचं आहे. ज्यांना मित्र-मैत्रिणी नाहीत, त्यांच्या जीवनात खळाळणाऱ्या निर्झराचा आनंद कुठून येईल? मैत्री निसर्गासारखी सुंदर,

चंद्रासारखी नितळ, समुद्रासारखी खोल अन् धरतीसारखी प्रेमळ असावी. तिला स्वार्थाचा , बिभत्सतेचा स्पर्श नसावा.

मैत्री आभाळाएवढं दुःख विसरायला लावते. कधी रडण्यासाठी, कधी हसण्यासाठी, कधी मनातलं गुपित खुलण्यासाठी, तर कधी डोईजड झालेल्या दुःखाला विश्वासानं डोकं टेकण्यासाठी आयुष्यात मैत्री नावाचं हक्काचं व्यासपीठ एखादं तरी असावं.

मैत्री.... नको फुलासारखी क्षणभर सुगंध देणारी

नको सूर्यासारखी सतत तापलेली

नको सावलीसारखी कायम पाठलाग करणारी

मैत्री.... हवी 'अश्रू'सारखी सुख-दुःखात समान साथ देणारी....



# माझी माय

संसाराच्या जंजाळात
माय माझी वाढलेली,
गरिबीच्या चटक्यानं
रया निघून गेलेली ॥१॥
काम करूनिया खाणे
आणि समाधानी होणे,
आभाळाच्या छायेखाली
क्षणभर विसावणे ॥२॥
थंडी अन् ऊन, वारा
कधी नाही थांबलेला,
झेलुनिया कष्ट सारे
महापुरातही वाचली ॥३॥
खाऊपिऊ घालताना
केली नाही हयगय,
गाय जशी गोठ्यातली
तशी होती माझी माय ॥४॥
सपनात माझ्या
माझी माय आली,
क्षेमकुशल विचारून
हळूवार निघून गेली ॥५॥
जाता-जाता, बोलते कशी
दुःख देऊ नको कुणाला,
हातामध्ये हात
घालुनिया चाला ॥६॥

कु. कुंभार अनुराधा भिमराव
बी. एस्सी.-३

# शेतकऱ्यांच्या संकटाचा मार्ग आत्महत्याच आहे का...?

कु. ढेरे नेताजी साताप्पा
बी. ए. २

विदर्भ-मराठवाड्यात दुष्काळाने कहर केला आहे. कधी अतिवृष्टी, कधी पावसाचा अभाव, गारपीठ, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि सर्व काही सुरळीत होऊन क्वचित शेती उत्पादन चांगले आले तर शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही, अशी स्थिती. परिणामी गेल्या दहा-बारा वर्षांत विदर्भात चौदा हजारांच्या वर आणि मराठवाड्यात गेल्या अवघ्या तीन महिन्यात चारशेच्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही बाब चिंताजनकच म्हंटली पाहिजे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने आता ७,००० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. पाठोपाठ नाशिक, धुळे व कोकण परिसरात झालेला अवकाळी पाऊस नि गारपिटीमुळे बागायती शेतीचे जे नुकसान झाले, त्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या मागे शासन वीजबील आणि कर्जवसुलीसाठी तगादा लावणार नाही, अशी ग्वाही देऊन टाकली. यापूर्वी मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारने अनेक पॅकेज जाहीर केली; पण म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या काही थांबल्या नाहीत. राज्य सरकारने ७,००० कोटी रुपयांचे ताजे पॅकेज जाहीर केल्यानंतरही आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे, हे असे का? तर ही पॅकेज फसवी असतात. पॅकेजमध्ये भ्रष्टाचार होतो व शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही पडत नाही, असे निरीक्षण पी. साईनाथ यांनी 'दुष्काळ आवडे सर्वांना' या त्यांच्या पुस्तकात नोंदविले आहे. तात्पर्य, पॅकेज जाहीर करून, पैसा देऊन भागत नसते, तर शेती सुधारणेच्या दीर्घकालीन उपाययोजना आखणे अपरिहार्य असते; पण हा वेगळ्या चर्चेचा विषय आहे. मूळ प्रश्न असा की, दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हाच काय संकटमुक्त होण्याचा एकमेव मार्ग आहे? दारिद्र्यात काय फक्त शेतकरी वर्गच भरडून निघतो आणि अन्य समाजघटक काय मोठ्या सुबत्तेत जगत आहेत? असे काहीही नाही. शेतकऱ्यांपेक्षाही कंगाल नि तुच्छ जीवन जगणारे कितीतरी समाजघटक समाजात असून, सर्वस्वी प्रतिकूलतेशी सामना करीत करीत ते जगतच आहेत. तेव्हा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आत्महत्यांचे सत्र अवलंबिणे ही बाब संवेदनशील मनाने समजून घेण्याची असली, तरी ती मानसशास्त्रीयदृष्ट्या गूढच वाढते.

दलित समाजाला आपल्या समाजव्यवस्थेने पिढ्यान्‌पिढ्या अस्पृश्य ठरविले. त्यांना तुच्छ आणि हीन वागणूक देताना जगण्याचेच स्वातंत्र्य नाकारले. दारिद्र्य, शोषण हे तर त्यांच्या पाचवीला पुजले आहे. रानटी अत्याचार अजूनही हा समाज खेडोपाडी सोसतो आहे; पण म्हणून घृणास्पद विषम समाजव्यवस्थेच्या जाचाला कंटाळून दलित समाज आत्महत्यांचे सत्र अवलंबिताना फारसा कधी दिसला नाही. उलट घरातील किडूकमिडूक विकून शिक्षण घेण्याचा मार्ग या समाजाने स्वीकारला. दारिद्र्याशी, अपमानाशी झुंज घेऊन उभे राहण्याची धडपड

चालविली. दुसरीकडे मुस्लिम समाजात शिक्षणाचा प्रचंड अभाव आहे. पराकोटीचे दारिद्र्य आहे; पण या समाजातील छोटी-छोटी मुले पडेल ते काम करून जगण्याची जिद्द सोडत नाहीत. भटके-विमुक्त, आदिवासी यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण पराकोटीचे आहे. झाड-पाला, कंदमुळे खाऊन जगणाऱ्या जमाती अजूनही डोंगरदऱ्यात आहेत. चहासाठी दूध, चहाची पावडर आणि फोडणीसाठी गोडे तेल वापरण्यात येते. याचीही त्यांना माहिती नाही; पण म्हणून नको हे असले दरिद्री जीणे म्हणून ते जीवनच संपवतात असे ऐकिवात नाही. राज्यातील कापड गिरण्या बंद पडल्यामुळे गिरणी कामगार देशोधडीला लागला. त्यांच्याही रोजीरोटीचे प्रश्न आहेत. आरोग्याचे, शिक्षणाचे प्रश्न आहेत; पण अशाही प्रतिकूल परिस्थितीत कामगार वर्ग धडपड करीत जगतच आहे ना? गरिबीमुळे उत्तर प्रदेश, बिहार व दक्षिणेतील लोक मुंबईस येतात. झोपडपट्ट्यांत राहतात; पण पडेल ते काम करून जीवन जगण्याची ऊर्मी दाखवितातच ना? भोपाळ वायुकांडात अपंग झालेल्यांनी जगण्याची जिद्द सोडली काय? ब्राह्मण समाजाने एकेकाळी वार लावून माधुकरीवर आपले शिक्षण पूर्ण केलेच ना? अशी किती म्हणून उदाहरणे द्यावीत? तेव्हा शेतकऱ्यांची मुले सत्तेत असताना आणि शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असताना नापिकी, कर्जबाजारीपणामुळे खचून जाऊन शेतकरी जर आत्महत्यांचे सत्र अवलंबित असतील, तर ती दुःखाची बाब नव्हे काय? शेतकरी बांधव नापिकी, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करतो हे खरे; पण म्हणून अन्य समाजघटकात गरिबी, दारिद्र्य यांमुळे आत्महत्या होतच नाहीत असे कसे म्हणता येईल? तेव्हा अशा आत्महत्या करणाऱ्यांची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे काय? आणि असेल तर ती जाहीर करून अशा संकटग्रस्त कुटुंबासाठीही आर्थिक सहकार्याच्या योजना शासन का आखीत नाही? शेतकरी वर्ग नापिकी, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करतो, तेव्हा त्यांच्या शेतावर राबणाऱ्या दलित मजुरांच्या कुटुंबाचीही वाताहत होते याचा विचार शासन का करीत नाही? हासुद्धा एक प्रश्नच आहे.

शेतकऱ्यांचीच मुले राज्यात राज्य करीत आली, तरीही या सर्वांनाच शेतकऱ्यांच्या जीवघेण्या समस्या दूर का करता आल्या नाहीत? हा संशोधनाचा विषय आहे. पॅकेज-कर्जमाफी हा काही शेतकऱ्यांच्या समस्येवरील अंतिम उपाय नव्हे. निवडून यायचे, तर पॅकेज जाहीर करून मोकळे व्हावे, असे धोरण प्रत्येक सरकारने अवलंबिले; पण असे तात्कालिक उपाय ही वरवरची मलमपट्टी ठरते. शेती सुधारणेचे दीर्घकालीन उपाय योजणे हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याचा खरा मार्ग आहे. शेतकऱ्यांनी मात्र आत्महत्या करता कामा नये. बळिराजा जगाचा पोशिंदा आहे. लाख मेले तरी चालतील; परंतु लाखाचा पोशिंदा मरून चालणार नाही. या म्हणीप्रमाणे जो अन्नधान्य पिकवून जगाला पोसतो, त्याने खंबीर होऊन येणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांना धैर्याने सामोरे जावे, असे मला वाटते. जीवन खूप सुंदर आहे, त्यांच्यामागे त्यांचे कुटुंब असते. याचा त्यांना कधीही विसर पडू नये दुसरे काय?

# एक आव्हान पाण्याचे.....

- कु. पूजा बाळासो फराकटे
बी. ए. भाग - २



" पाणी म्हणजे जीवन,
त्यासाठी मनुष्य करतो वनवन.
पाणी बनले एक आव्हान,
अपव्यय विरोधी मांडा प्रस्थान."

" पाण्याविना जीव कसा कासावीस होतो, एकवेळ माणूस अन्नाशिवाय थोडा काळ राहू शकतो; पण पाण्याशिवाय शक्य नाही! पाण्याची मुलभूत गरजेत गणना आहे. आज अशा पाण्याविषयीचे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पृथ्वीतलावर सर्वात जास्त प्रमाण पाण्याचेच आहे; पण ७१% पाण्यापैकी केवळ १% पाणी पिण्यायोग्य आहे. या पाण्याचा वापर पिण्यासाठी, शेतीसाठी, कारखानदारीसाठी, वीजनिर्मितीसाठी अशा विविध कारणांसाठी केला जातो. पाण्याच्या वापरापेक्षा अधिक अपव्ययामुळे पाणीटंचाईसारखी गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

अगदी काटकसरीने जगायचे ठरविले, तर ३००-३५० मिमि पाऊस पुरेसा ठरतो. जमिनीच्या खाली अमाप भूजल साठे असतात. विहीर खोदली, तर पाणी लागलेच पाहिजे, कितीही पाणी उपसले तरी चालू शकते. या भ्रामक समजुतीपासून आपण जितक्या लवकर बाहेर येऊ शकू, तितके चांगले राहील. जमिनीच्या पोटात वेगवेगळ्या स्तरांवर जलधर असतात. पहिला जलधर हा उथळ असतो. तो दरवर्षी पडणाऱ्या पावसाने भरत असतो; पण खालील जलधर मात्र भरण्यासाठी काही वर्षे लागतात; पण ज्या पद्धतीने आपण पाण्याचा उपसा सुरू केला आहे, त्यामुळे या जलधरांमध्ये जमा कमी; पण उपसाच जास्त अशी परिस्थिती आढळते. याचा परिणाम म्हणूनच भूजल पातळी सतत घसरायला लागली आहे, त्यामुळे पाणी प्रश्न हे एक आव्हानच बनले आहे."

पाण्याबाबतीत अंथरूण पाहून पाय पसरणे महत्त्वाचे ठरते. आपले अंथरूणच तोकडे आहे. याची आपल्याला केव्हा जाणीव होणार?

" अरे माणसा माणसा कधी होणार तू जागा,
पाणी प्रश्न सोडवण्याचा कधी सापडणार तुला धागा?"

कोकण व विदर्भ पावसाच्या बाबतीत समाधानी आहेत. कोकणात ३००० मिमी पेक्षा अधिक, तर विदर्भात १००० मिमीहून अधिक

पर्जन्यमान आहे. पाण्याची बचत करण्यासाठी आधुनिक पाणी पद्धतीचा वापर केला पाहिजे; पण आपण सिंचनाची पारंपरिक पद्धती सोडायला तयार नाही. प्रवाहाने पाणी देण्यापेक्षा ठिबक सिंचन, तुषार सिंचनाने दिले तर पाण्याची मोठी बचत होते, हे आपल्या कानीकपाळी किती वर्षापासून ओरडणे चालू आहे? आपण मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहोत. ही माणसाची सर्वात मोठी चूक आहे. त्यामुळेच 'पाणी'सारखा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

माणसाने पाणी वाचविण्याचा एक मंत्रच लक्षात ठेवला पाहिजे, की–

'पाणी अडवा हावरटपणे; पण वापरा मात्र विवेकाने'

पाणी प्रश्न गंभीर आहे, तो सोडवला गेलाच पाहिजे. फक्त सरकारला बळीचा बकरा बनवू नका. लोकांचा सहभाग असल्याशिवाय कोणतेही सरकार जादूच्या कांडीने पाणी प्रश्न सोडवू शकणार नाही, हे लक्षात ठेवले तरच मार्ग निघू शकेल.

⅄⅄⅄



## अडाणी पण जिद्दी माय....

राबत हाय
रक्ताचं थेंब गाळत हाय
पर पोराला तिला कुणीबी नाय
पर पोराला तिला 'इंजिनिअर' करायचं हाय
भष्ट्राचारी या जीवनात ती एकलीच हाय
जिव्हाळ्याचं, आपलं तिला कुणीबी नाय
पर पोराला तिला इंजिनिअर करायचं हाय.
भिंतीला दांडगं भगदाड हाय
झोपडीचं छत फाटकं हाय,
पर पोराला तिला 'इंजिनिअर' करायचं हाय
पोटासाठी राबती हाय
साळसाठी पोराच्या दिवस दिवस ढकलत हाय
अंगावर फाटकं चिंदुक हाय
पर पोराला तिला 'इंजिनिअर' करायचं हाय
पोराला म्हणती माय
बाळा, कधी भ्याचं नाय
तुझी माय अजून जीती हाय
काय बी झालं तरी
तुला 'इंजिनिअर' व्हायचं हाय.

कु. पाटील प्रणिता जयसिंग
बी. एस्सी. - २

# गोष्ट एका लढाऊ मित्राची

- कु. धनश्री पांडुरंग यागयेकर
बी. एस्सी.-२

देशप्रेमाने तो पुरता भारावून गेला होता. तारुण्याची रग त्याला शांत बसू देत नव्हती. देशासाठी काहीतरी करायचं या विचारानं तो सैन्यात दाखल झाला. आकाशात युद्धाचे ढग जमा झाले आणि त्याच्या अंगात चैतन्य संचारलं. केव्हा एकदा युद्धावर जातो असं त्याला झालं.

आईवडिलांना मात्र चिंता वाटू लागली. युद्ध ! दोन्ही बाजूंनी बंदुकांच्या फैरी झाडल्या जाणार. तोफगोळे उडविले जाणार. बॉम्बचा वर्षाव होणार. आपल्या बाळाचं काही बरंवाईट झालं तर?

त्याला मात्र हा विचारही शिवला नाही. तो युद्धावर गेला. शत्रूच्या थेट गोटात शिरला. त्यांची दाणादाण उडविली आणि मोठा पराक्रम गाजवून युद्धावरून तो परत आला. चिंताक्रांत झालेल्या आपल्या आईवडिलांना सीमेवरूनच त्यानं फोन केला. '' मी परत आलो आहे; पण माझ्याबरोबर माझा एक सैनिक मित्रही आहे. माझा खूप जवळचा मित्र आहे तो. मी त्याला माझ्याबरोबर घरी आणू का?

''निश्चित, तुझ्या मित्राला तू अवश्य बरोबर घेऊन ये. त्याला भेटायला आम्हालाही आवडेल.'' त्याच्या आईवडिलांनी सांगितलं.

'' पण तत्पूर्वी मला तुम्हाला आणखीही काही सांगायचं आहे. माझा हा सैनिक मित्र युद्धात जबर जखमी झाला आहे. एक हात आणि एक पाय त्याला युद्धात गमवावा लागला आहे. माझ्याशिवाय त्याला दुसरं कोणीही नाही आणि इतर कुठे तो जाऊही शकत नाही. तो माझ्याबरोबर, आपल्याबरोबर रहावा असं मला वाटतं.''

वडिलांचा स्वर आता बदलला. ते म्हणाले,'' तू काय म्हणतोयस हे तुला कळतंय का? तुझ्या अशा अपंग, स्वतः काहीही करता न येणाऱ्या मित्राला घरी ठेवलं, तर त्याचं हे लोढणं आपल्याला कसं झेपेल याचा काही विचार तू केला आहेस का? आपल्याला आपलं स्वतःचंही आयुष्य आहे. आपल्या आयुष्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार इतर कोणालाही नाही. मला वाटतं तू फक्त एकट्यानेच घरी यावंस. त्या मित्राला तू विसरून जा. स्वतः जगण्यासाठी त्याला काही तरी दुसरा मार्ग निश्चितच सापडेल किंवा तसा मार्ग तो स्वतःच शोधून काढेल.''

वडिलाचं हे बोलणं ऐकल्यावर अधिक काहीच न बोलता मुलानं लगेच फोन ठेवला.

असेच काही दिवस गेले. थोड्याच दिवसांनी त्याच्या आईवडिलांना पोलिसांचा फोन आला. उंच इमारतीवरून पडल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. बहुधा त्यानं आत्महत्या केली असावी. आम्हाला वाटतंय, तो तुमचा मुलगा आहे. ओळख पटवायची आहे. तुम्ही ताबडतोब निघून या.

चिंता आणि काळजीनं आईवडिलांचा जीव पोखरून निघाला. तो आपला मुलगा नसावा, अशी

हजारदा प्रार्थना केली. तशाच अवस्थेत ते झटक्यात निघाले. पोलिसांनी त्यांना शवागारात नेलं. धडधडत्या हृदयानं त्यांनी मृतदेहावरची चादर दूर केली.

हो, त्यांचाच मुलगा होता तो.

आपल्या काळजाच्या तुकड्याला त्यांनी क्षणार्धात ओळखलं.... पण.... पण त्याही अवस्थेत त्यांना मोठा धक्का बसला. त्याला केवळ एकच हात आणि एकच पाय होता....



– अर्चना मानसिंग ढंगे
बी. एस्सी. २

## काहीतरी चुकत गेले

अनेकदा विचारले तिला
तिच्याकडेही उत्तर नसे.
मग तुकड्या तुकड्याने
माझे मला सुचत गेले
काहीतरी सुचत गेले
दिवस होते मंतरलेले
खोल बुडून जाण्याचे
आनंदात, एकमेकांत
तरी मनात काही खूपत गेले
काहीतरी चुकत गेले
दिवस होते धागे विणण्याचे
रेशमाचे, जरतारीचे
आयुष्यांना एकमेकांत गुंफण्याचे
वस्त्र विणता विणता विणत गेले
काहीतरी चुकत गेले
दिवस होते उमेदीचे
चिवचिवित काड्या जमविण्याचे
घरटे बांधण्याचे
कळस बांधण्याआधीच घर खचत गेले
काहीतरी चुकत गेले
काय घडले कोण चुकले
पडत मात्र गेली शकले
मौनांचे वास्तव्य ओठावरती वाढत गेले
अन् पाणी हळूहळू डोळ्यात भरत गेले
काहीतरी चुकत गेले

– संतोष आडसुळ
बी. एस्सी.-३

# नव्या जगाचा शोधक – ख्रिस्तोफर कोलंबस

– पाटील संजीवनी रामदास
बी. एस्सी.३ (बॉटनी)

ख्रिस्तोफर कोलंबस हा मोठा साहसी होता. एकेदिवशी जीवनाची बाजी लावून तो जगाच्या माहीत नसलेल्या देशांच्या शोधासाठी निघाला. समुद्राच्या छातीवर तुफानी लाटांमध्ये आपल्या छोट्या जहाजाद्वारे मजल दरमजल करत त्याने अमेरिकेचा शोध लावला. त्याला नवे जग असेही म्हणतात.

या कोलंबसचा जन्म ७ सप्टेंबर १३५१ मध्ये इटलीतील एका विणकराच्या घरी झाला होता. इटलीच्या उत्तरेकडील समुद्राच्या पश्चिम किनाऱ्यावर जिनीव्हा नावाचे प्रसिद्ध शहर आहे. कोलंबसचे वडील तेथेच राहात होते. त्यांचा व्यापार होता आणि विणण्याचे कामही ते करत होते. २१ वर्षांपर्यंत कोलंबस आपल्या वडिलांसोबत त्यांच्या कामात मदत करत होते. तो कधीही शाळेत गेला नाही आणि त्याला कधी लिहिण्यावाचण्याची संधी मिळाली नाही. वडीलांसोबत नेहमी छोट्या नावेत बसून त्याला प्रवास करावा लागत असे.

याच दरम्यान एकदा तो वडिलांसोबत अशाच एका नावेत बसून उत्तर आफ्रिकेपर्यंत जाऊन आला. हळूहळू त्याच्या मनात दूरदूरच्या समुद्रयात्रा करण्याची इच्छा वाढू लागली.

कोलंबस साहसी आणि शांत स्वभावाचा होता. भरपूर उंची, भरदार शरीर आणि रंग अतिशय गोरा असे त्याचे व्यक्तिमत्त्व होते.

त्यावेळेपर्यंत पृथ्वी गोल आहे, ही गोष्ट स्पष्ट झाली होती; परंतु त्या माहितीचा लाभ सर्वात प्रथम कोलंबसनेच घेतला. दुसऱ्या प्रवाशांचे लेख वाचून त्याला समजले होते, की चीन आणि जपान आशियाच्या पूर्वभागात आहेत. म्हणून त्याने विचार केला, की पृथ्वी जर गोल आहे, तर आशियाच्या पूर्व सीमा युरोपच्या पश्चिम सीमेशी जोडलेल्या असल्या पाहिजेत आणि असे असेल, तर चीन, जपानपर्यंत पोहोचण्यासाठी पश्चिमेकडून यात्रा सुरू केली पाहिजे.

३ ऑगस्ट १३९२ या दिवशी कोलंबसचा एक छोटासा गट स्पेन पोलोस बंदरावरून आशियाचा नवा मार्ग शोधण्यासाठी पश्चिमेकडे रवाना झाला. आशिया म्हणजे खास करून भारतात पोहोचणे हे त्याचे लक्ष्य होते.

कोलंबस आणि त्याच्या सहकाऱ्यांनी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता, की भारताचा नवा रस्ता शोधण्याच्या प्रयत्नात त्यांच्या माथ्यावर नव्या जगाच्या शोधाचा मुकुट चढवला जाईल.

# असा माझा गाव....

- अस्वले मोरेश्वर दत्तात्रय
बी. ए. भाग - २

सह्याद्रीरागांच्या अंगाखांद्यावर खेळलेला वारा डोंगराच्या भैरीला पदस्पर्श करून थेट घुसतो, तो दूधगंगा माईच्या उजव्या कुशीत विसावेल्या सरवडे गावच्या रोमरंध्रात.

कोकण संपतो आणि घाटमाथ्याचं प्रवेशद्वार म्हणून समजला जातो, तो राधानगरी तालुका. याच तालुक्यातील सर्वच क्षेत्रात अग्रगण्य गाव म्हणून ओळखलं जातं ते सरवडे. इथल्या माणसांची सामाजिक गुंफण जणू मडक्यातलं दही. प्रत्येक कण सुट्टा असूनही एकमेकांशी घट्ट जोडलेला, नाळ गुंतलेला. सर्व जाती-धर्म, अलुतेदार-बलुतेदार एकमेकांशी मिळून मिसळून अगदी श्रावणातला इंद्रधनू. इथले सण, उत्सव, परंपरा अगदी मोठ्या प्रमाणात आणि मनोभावे साजरे केले जातात.

इथली मातीच उपजाऊ त्यामुळे मन, मनगट आणि मेंदू यांचा सुंदर मेळ घालणारा, इथला समाज प्रत्येक क्षेत्राला अगदी हळूवार स्पर्श करताना दिसतो.

स्वातंत्र्यसंग्रामात इथे कुणी 'कृष्ण' नसला, तरी पर्वत उचलण्यात मोलाची साथ देणारा 'गिरीजन' तो इथलाच. स्वातंत्र्यसूर्य उगवला; पण काही संस्थानचे ग्रह लुकलुकू लागले. पैकी गोवा मुक्ती संग्रामात घर संसार आणि बंध पाश तोडून उडी घेतली ती इथल्याच तरुणांनी. सार्वभौम भारतात लोकशाहीची स्थापना झाली आणि सामाजिक उन्नतीची ओढ असणाऱ्या इथल्या पुरोगामी विचारांच्या समाजधुरीणांकडून १९६० च्या दरम्यान शाळा, संघ, कारखाना, सोसायट्या यांच्या माध्यमातून सहकाराचा श्रीगणेशा गिरवला गेला. भारतासारख्या खंडप्राय आणि कृषिप्रधान देशात बळिराजा सुखी झाला, तर देश सुखी होऊ शकतो. या प्रगल्भ विचारातून काळम्मावाडी धरणाचा पुरस्कार आणि हट्ट धरला गेला. किंबहुना त्याही अगोदर शेतीचं महत्त्व ओळखून १९३७-३८ च्या दरम्यान सद्यःस्थितीत उदोउदो होणारे कृषी प्रदर्शन भरवले गेले ते याच सरवडे गावात.

लोकशाही रुजली. लोकशाहीचा आदर करणारे इथले शिलेदार अन्यायाचा प्रतिशोध विचारांनीच घेण्याची इथली परंपरा आणि म्हणूनच १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत बंडाची यशस्वी डरकाळी फोडली गेली ती याच मातीतून. समाजातील प्रत्येक माणसाचं जीवन सुंदरतेनं भरलेलं असावं. त्याचं राहणीमान तेवढच चांगलं असणं गरजेचं आहे. ते ओळखूनच समाजाचं योग्य नेतृत्व करणाऱ्यांनी गावातील मुख्य रस्त्याचा रुंदीकरणाचा निर्णय हा खरोखरच एक पुरोगामी निर्णय होता, हे आजही मान्य करावं लागेल.

अशी ही वैभवशाली परंपरा असणारा माझा गाव आज कसा आहे? हे वर्णितांना सुंदर डोळ्यांना जग सुंदरच दिसतं अशा उक्तीप्रमाणे जाऊया.

शैक्षणिकदृष्ट्या या गावाचा डंका अखंड

महाराष्ट्रभर. ज्ञानेश्वरांना हृदयात स्थान असणाऱ्या या गावात ज्ञानवतांचा आदर केला जातो, त्यामुळे इथल्या तरुणांनी प्रशासन, डॉक्टर, इंजिनिअर, वैमानिक, शिक्षक अशा अनेक क्षेत्रात गरूडभरारी घेतली आहे. इथले अटकेपार झेंडे रोवणारे कलाकार तर चित्रकलेच्या माध्यमातून महाराष्ट्राचा अभिमान ठरणारे कलावंत ठरले ते याच मातीतून. गायन, वादन, किर्तन, भजन, लेझीम तर इथलं अविभाज्य अंग.

मन आणि तल्लख बुद्धी तसेच क्रीडाक्षेत्रातील इथली परंपरा महानच. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण करणारी इथली माती. मन, मनगट आणि मेंदू या त्रिसूत्रीचा आदर करणारे इथले मल्ल कुस्तीमध्ये आपल्या गावाचे नाव नेहमी उज्ज्वल करत आले. कला, खेळ, बुद्धी अशा सर्वच क्षेत्रात आघाडीवर असणारा माझा गाव शाहिरांसाठी तर शाहिरीच विद्यापीठ होय. असे कला, गुण, साहित्य आणि रसिकतेने बहरलेला माझा गाव.

इथल्या तरुणांनी प्रत्येक क्षेत्रात नाव कमावलेले आहे. भारतभर सर्वदूर पोचलेले इथले तरुण. काही तरुण परंपरागत शेतीत आणि उद्योगात रमलेले, रांगड आयुष्य जगणारे. सकाळी दोन घणघणीत वैरणीची वझ्झी आणली, की झाला गडी निवांत; पण या निवांतपणात गावगप्पा ओघाने आल्याच. कोणाचं रस्सा मंडळ असो की आमटी मंडळ. तिथे अगदी भात कोणत्या जातीचं चांगलं हाय इथपासून ते भारताची मंगळस्वारी येथपर्यंत विषय हमखास रंगलेला. चांगल्याचा आदर आणि वाईटाचा समाचार हा येथील स्थायीभाव. एखादा परका नकळत चुकला, तर मोठेपणाने माफ करण्याचा दिलदारपणा आणि जाणीवपूर्वक चुकीच्या वाकड्या मेढीला वाकडं नाळ मारण्याची खुबी ती इथलीच. या गावात एखादा परदेशी बाबू केव्हा आपला होऊन जातो, हे त्यालाही कळत नाही, ही इथल्या जगण्यातील सहजता.

असा हा माझा सर्वांगसुंदर गाव.

परंपरांचा पाईक, नावीन्याची आस असणारा, सत्याचा समर्थक, ज्ञानाचा उपासक, तत्त्वाचा चिंतक, सत्वाचा ठेवणदार, संस्कृतीचा प्रसारक, गुणांचा प्रचारक, दुर्जनांचा संहारक, सज्जनांचा हितचिंतक.

▲▲▲



– गणेश दिनकर हिंगे
बी. एस्सी. ३

# थोर कवी - आरती प्रभू

प्रवीण पाटील

कवीवर्य चिंतामण त्र्यंबक खानोलकर हे 'आरती प्रभू' या टोपण नावाने कविता लिहित. त्यांची पहिली कविता 'वैनतेय' नियतकालिकात छापली गेली. त्या काळी 'मौज' मासिकात कविता येणे प्रतिष्ठेचे मानले जाई. खानोलकरांनी 'आरती प्रभू' या टोपण नावाने एक कविता लिहून 'मौज' मध्ये छापण्यास पाठवली. ती कविता खूपच लोकप्रिय झाली, त्यामुळे लोक त्यांना 'आरती प्रभू' या नावानेच ओळखू लागले.

आरती प्रभूंचा जन्म वेंगुर्ल्यातील बागलांची राय या गावात ८ मार्च १९३० रोजी झाला. त्यांची आई खानावळीचा व्यवसाय करी. ते देखील आईला मदत करत.

त्यांच्या अनेक कविता गाजल्या. 'नक्षत्राचे देणे', 'कुणाच्या खांद्यावर', 'समयीच्या शुभ्रकळ्या' इ. उदाहरणादाखल सांगता येईल. त्यांच्या काव्यात एक गुढता असे. शब्दांतील तरलता व कवितेला असलेला एक नाद ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये. नक्षत्रांचे देणे, जोगवा, दिवेलागण हे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह तर सनई, राधा, पाखरू, गणूराया हे त्यांचे कथासंग्रह. त्यांच्या काही कादंबऱ्याही खूप गाजल्या. रात्रकाळी घागरकाळी, अजगर, कोंडुरा, त्रिशंकू, पिशाच्च, पाषाण, पालवी इ. यांपैकी काही तर एम. ए. ला अध्ययनसाठी होत्या. एक शून्य बाजीराव, अजब न्याय वर्तूळाचा ही त्यांनी नाटके लिहिली. मराठी साहित्याला हा असा अनमोल ठेवा खानोलकरांनी दिला. 'नक्षत्रांचे देणे' या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कारही लाभला.

१९५९ साली त्यांना मुंबई आकाशवाणीत स्टाफ आर्टिस्ट म्हणून नोकरी मिळाली; पण दोन वर्षातच ही नोकरी सोडली. त्यांचा स्वभाव एककल्ली असल्याने त्यांचं फार नुकसानच झालं. त्यातच घरातलं दारिद्र्य, कुटुंबातील व्यक्तींचे मृत्यू व मनातील अस्वस्थता यामुळे बराच काळ त्यांना मानसिक तणाव सहन करावा लागला. त्यांच्या नैराश्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेतून प्रकट झालेले दिसून येते. असा हा थोर साहित्यिक वयाच्या ४७ व्या वर्षी २६ एप्रिल १९७६ रोजी काळाच्या उदरात गडप झाला. तो न परतण्यासाठी....

# स्पर्श

– कांबळे सुरेश गोपाळ
स्वलिखित

रेल्वेच्या धडधडण्याचा आवाज माझ्या कानात घोंगावत होता. पुणे स्टेशन आले, असे माझ्या आसपासचे लोक कुजबुजत होते. ते शहर माझ्यासाठी नवीन होते. घोड्याहून स्वार होऊन धावणारे ते शहर !

तसा गावाहून आलेला मी दीपक. बारावी सायन्स तालुक्याला झालेले; पण मनात शिक्षणाची ओढ आणि पुढच्या शिक्षणासाठी माझ्या शिक्षकांच्या सांगण्यावरून मी पुण्यात आलो.

मी स्टेशनवर उतरलो, तसा सात प्लॅटफॉर्म पाहून गोंधळलो. कसाबसा पत्ता शोधत मी मला दिलेल्या पत्त्यावर पोहोचलो. दारावरची बेल वाजविली आणि थोड्या वेळाने आतून मध्यम वयाची महिला बाहेर आली. मी त्यांना शिक्षकांनी दिलेली चिठ्ठी दिली आणि मला घराच्या बाजूला असलेल्या खोलीत घेऊन गेल्या.

त्या रात्री मी खोलीत एकटाच होतो. गावाहून आणलेले साहित्य लावून झाले आणि जेवणही केले; पण अचानक दारावर थाप मारली! कोण असावे ? या संभ्रमातच मी दरवाजा उघडला, तर त्या साने काकू होत्या. त्यांनी मला ताटातून जेवण आणले होते; पण मी जेवण केले हे समजल्यावर त्या माझ्यावर रागावल्या आणि म्हणाल्या " मी उद्यापासून तुझे जेवण बनवेन, समजल." असे सांगून त्या निघून गेल्या.

माझं कॉलेज तसं लांब नव्हतं; पण चालत गेल्यावर पाच मिनिटांची वाट. माझे दोनचार दिवस असेच गेलेत. काकू सकाळ-संध्याकाळ जेवण घेऊन येत आणि मी त्यांच्याकडे सकाळी व संध्याकाळी चहाला जात.

तो मंगळवार होता. मी कॉलेज करून लवकर घरी आलो. थोडं डोकं दुखत होतं, म्हणून मी खाटेवर आडवा झालो; पण काही वेळानंतर माझ्या कानावर मधुर आवाज आला. "चहा घे. चहा आणला आहे." चहाचा कप हातात घेऊन माझ्याच वयाची तरुणी माझ्या खोलीत आली. गौरवर्ण आणि उजळ चेहरा यामुळे तीचे सौंदर्य उठून दिसत होते. आणि ती चहाचा कप ठेवून निघून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी चहाला गेल्यानंतर पुन्हा मला ती दिसली. आरशात बघत ती केस विंचरत होती. नंतर मला समजले, की तिचं नाव दीपा व ती माझ्याच वर्गात म्हणजे बी एस्सी-१ मध्ये शिकत होती.

वाऱ्याच्या झोतासारखे दिवसामागून दिवस निघून जात होते. दीपा मला वर्गामध्ये, घरामध्ये वरचेवर भेटत होती. वरचेवर आमचे बोलणेही होत होतं. माझी दोन वर्षे कधी निघून गेली, हे समजलही

नाही. दोन्ही वर्षांमध्ये मला फर्स्ट क्लास मिळाला होता. मी ठरवलं होतं, की तिसऱ्या वर्षी चांगले मार्क्स मिळवायचे.

मी एक दिवस खोलीत असाच बसलो होतो. त्या वेळी अचानक दीपा खोलीत आली. मी तिला बसायला खुर्ची दिली. ती घाबरलेल्या अवस्थेत मला सांगू लागली, आणि ते ऐकून माझा माझ्यावरच विश्वास बसत नव्हता. ती माझ्यावर एकतर्फी प्रेम करीत होती. ती गेली तीन वर्षे आपले विचार आपल्या मनात दडपून ठेवून आपली वाटचाल करीत होती. ती माझ्या गळ्यात पडून ओक्साबोक्शी रडत होती. मी तिला समजावण्याचा प्रयत्न केला; पण ती समजण्याच्या अवस्थेत नव्हती आणि नंतर लगेच ती निघूनही गेली. रात्री काकू जेवण घेऊन आल्या. त्या वेळी काकू मला म्हणाल्या, की ''दीपाची तब्येत बिघडली म्हणून ती आज लवकर झोपी गेली आहे.'' आणि मी सुद्धा जेवण लवकर आटोपले.

थोड्या दिवसांनी माझी शेवटची टर्मदेखील संपली व त्याचा निकालही चांगला लागला. मी काही नोकरीसाठी अर्ज केले होते, त्याचीही उत्तरं मला आली होती. मला एका कंपनीमध्ये चांगली नोकरी मिळाली व त्यासाठी मी काकूंचा आशीर्वाद घेऊन मुंबईला जाण्यास निघालो. त्याच्या अगोदर दीपाची भेट घ्यावी, म्हणून मी तिच्या खोलीत गेलो, तर तिची तब्येत खूप खराब झाली होती. मी आत गेल्यानंतर ती पुन्हा माझ्या गळ्यात पडून रडू लागली आणि माझ्याही अश्रूंच बांध फुटला व तेथून मी काढता पाय घेतला.

मुंबईसारख्या धावपळीच्या शहरात माझे दोन महिने कसे गेलेत, हे मला समजलेही नाही. एकेदिवशी मी रात्री वेळाने खोलीत आलो. दार उघडले. सकाळी कपाटात ठेवलेले पत्र हातात घेतले व ते वाचू लागलो, तर माझ्या हातातील पत्र थरथर कापत होते. माझे सर्वांग घामाने डबडबले होते. माझ्या हातातील पत्रामध्ये लिहिलं होतं, की दीपाने आत्महत्या केलेली आहे. खरंच का तिने माझ्यावर प्रेम केले होते. पण मी तिला समजावलं होतं, तरीपण तिने माझे ऐकले नव्हते. मी भूतकाळातील जुन्या आठवणीत गढून गेलो व दीपाच्या अनेक प्रतिमा माझ्या डोळ्यांवरून तरळून गेल्या. आणि मी ठरवलं. कपाटातील दहा-बारा गोळ्या घेतल्या व घशाखाली उतरवल्या. थोड्या वेळातच शांत झोप लागली, ती कामयचीच. मी आता झोपेतून कधीही उठणार नव्हतो, कायमचाच झोपी गेलो होतो.

सकाळचा सूर्य आपली नवीन किरणे घेऊन उगवला होता. खरंच की काय त्या दोघांची ही स्पर्शमय प्रेमकथा स्वर्गामध्ये तरी बहरेल काय या प्रतीक्षेत....

▲▲▲

# उत्साही जीवन

– कु. चौगले पूजा धनाजी
बी. ए. भाग-१

'जीवन' या एका शब्दावर आधारित आज किती तरी कथा, कविता, कादंबऱ्या व तत्त्वज्ञान प्रसिद्ध आहे. मग नेमके जीवन आहे तरी काय? जगण्याची तीव्र इच्छा कुणाला नसते? फक्त मनुष्यप्राण्यालाच नव्हे, तर पशुपक्षांनाही असते. कीडा-मुंगीलाही असते. माणसाच्या जन्माला केवळ नऊ महिन्यांचा इतिहास असला, तरी 'जीवनाला' अब्जावधी वर्षांचा इतिहास आहे, हे आपल्या ध्यानातच येत नाही.

जीवन ही एक वाहती नदी असून जन्म व मृत्यू हे तिचे दोन किनारे आहेत. जीवन आहे ऊन-पावसाचा खेळ, जीवन आहे सुख-दुःखाचा मेळ, जीवन आहे जन्म व मृत्यूचा पाठशिवणीचा खेळ. थोडक्यात जन्म व मृत्यू या दोन ठिकाणांतील अंतरास जीवन असे म्हणतात. मनुष्य जन्माला आल्यानंतर जीवन आकार घेऊ लागतं. रांगणं, बसणं, उभं राहणं, चालणं अशा अनेक विकसित प्रक्रिया जीवनात येऊ लागतात. एकदा का पायामध्ये चालण्याचं बळ आलं, की मनुष्याची बुद्धी झपाट्याने वाढू लागते. वाढत्या वयाबरोबर व बुद्धीबरोबर त्याचं जीवन आकार घेऊ लागते.

माणसाच्या जीवनाला सुखाची व दुःखाची झालर असते. त्या झालरीला अनेक स्तर असतात. सुखाच्या बाजूने विचार केला, तर सुखात ध्तणैक व कालैक अशा दोन छटा असतात. क्षणैक म्हणजे केवळ क्षणभर टिकणारे आणि अशा क्षणभर टिकणाऱ्या सुखाला खुशी म्हणतात. ट्रेनमध्ये जागा मिळणे, स्टॉपवर गेल्यावर जागा मिळणे, आवडीचा खाद्यपदार्थ खायला मिळणे इ. ही खुशीची उदाहरणे आहेत. त्या क्षणापुरती ही खुशी टिकते. ही खुशी अत्यंत क्षणभंगूर.... पुढच्याच क्षणी तिचा विसर पडतो.

खुशीचा वडीलभाऊ आहे आनंद. हा कालैक असतो. हा काही काळ होतो. याचा कालावधी क्षणभर नसून थोडा अधिक काळ आवशयक असतो. हा ही ओसरतोच; पण निदान काही तास, काही दिवस अथवा काही महिने हा आनंद टिकू शकतो. उदा. प्लॅट घेतला, परीक्षेत चांगले मार्क मिळणे, कार घेणे, लग्न जमणे.... हा ही कालखंड संपणाराच असतो; पण थोडा अधिक काळ अवश्य टिकतो. पण या पुढची असते 'प्रसन्नता' प्रसन्नता हा कायम टिकणारा स्त्रोत असतो. प्रसन्नता शाश्वत असते. प्रसन्नता ही आनंद निर्माण करून तो सतत ठेवू शकते. उदा. एखादं पक्वान्न करताना जसा त्या पक्वान्नाचा गोड वास घरभर दरवळतो, तशी प्रसन्नताही मनाला, तनाला व्यापून राहते.

जीवन गद्य नसावं, तर पद्य असावं, कारण गद्यात संवाद असतात. संवादामुळे वाद-विवाद, तर्क-वितर्क निघतात, म्हणून जीवन पद्य असावं. पद्यात गीत असतं, संगीत असतं. संगीत हे इतकं

आनंदमय असतं, की जवळ जवळ प्रत्येकाला गुणगुणावसं वाटतं. आवाज बेसूर असला, तरी स्वत:पुरतं तरी गावसं वाटतं. बाथरुममध्ये, शेतात, स्वयंपाक करताना माणसाला गुणगुणावसं वाटतं. कारण संगीत त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

माणसाचं जीवन हे एका वस्त्रासारखे आहे. वस्त्र हे जसे कापसाच्या धाग्यांनी बनलेले असते, तसेच माणसाच्या जीवनात भावनांचे आडवे-उभे धागे असतात. माणसाच्या जीवनात सुख-दु:खाचे भाव उमटत असतात. माणसाला जेव्हा सुख मिळतं तेव्हाही त्या सुखाचा तो पुरेपूर आनंद लुटू शकत नाही. त्या सुखाच्या क्षणीही....एक म्हणजे हे सुख पुन्हा मिळेल का? ही विवंचना त्याला दु:खी करीत असते, तर दुसरीकडे याहीपेक्षा अधिक सुख मिळू शकेल का? हा हव्यास त्याला पुन्हा दु:खी करीत असतो.

मानवाच्या जीवनात सुख-दु:ख अळवावरच्या पाण्यासारखं असतं. दु:ख लक्षात अधिक राहतं, कारण त्यातील पीडा, वेदना माणसाला जाणवत राहते. दु:खाचं प्रदर्शन करायला मानवाला आवडतं. मनुष्य सुख पाण्यासारखे घटाघटा पिऊन टाकतो व दु:ख चगळत राहतो. मुळात दु:खात अधिक गुंतल्यामुळे माणसाला दु:ख कुरवाळत बसायला आवडतं. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात;

सुख पाहता जवापाडे !
दु:ख पर्वता एवढे !

माणसाच्या जीवनात ज्या वेळी मनासारख्या गोष्टी घडत नाहीत, त्या वेळी मनुष्य म्हणतो, 'अरे देवा, आमचं नशीबच खोटं, जे करायला जावं ते अंगलट येतं, अपयश तर पाठ धरून मागं लागलंय, साडेसाती छळतेय, इतकं आमचं जीवन वाईट की त्यात कणभरही म्हणून सुख नाही.' अशासारखे बोल समाजात ऐकावयास मिळतात. माणसे नशीबालाच का दोष देतात? हे जग किती सुंदर आहे, किती मधुर आहे, जीवनात केवढ अमर्याद आनंद भरला आहे, मग माणसं अशी दु:खी का होतात? आनंदमय जीवन यांच्या नशिबी का नाही? याचं उत्तर आहे, प्रसन्नतेचा अभाव, समाधानाचा अभाव, प्रेमाचा, स्नेहाचा, आपुलकीचा, सकारात्मक विचारसरणीचा अभाव. या जगात जी खुशी असते, ती क्षणीकच, खुशीचा मोठा भाऊ आनंद तो कालिकच. तो काही काळ टिकतो. मात्र प्रसन्नता ही चिरकाल टिकते. प्रसन्नता म्हणजे आनंदी वातावरण. प्रसन्नतेमुळे माणसं मोठ्या आनंदात जगतात. प्रसन्नतेतून वाहणाऱ्या आनंदी वातावरणापासून हसरे चेहरे निर्माण होतात. प्रसन्नता ही मनुष्यास जगण्यास नवसंजीवनी देते.

शेवटी जीवन म्हणजे आहे तरी काय? प्रेम हेच जीवन आहे. प्रेम हे चिरंजीवी, विश्वव्यापी तत्त्व आहे. जगात जे जे विलोभनीय आहे, वेगळं आहे, आकर्षक आहे. सुंदर आहे, आपलसं वाटणारं आहे. अशा सर्वांवर मानव प्रेम करतो. प्रेमाची भूक ही माणसाला जन्मापासून ते अखेरपर्यंत असते. किंबहुना सर्वात पहिली भूक ही प्रेमाचीच असते. मूल मातेच्या उदरातून बाहेर पडल्यानंतर पहिला टाहो

फोडते ते दुधासाठी नव्हे, तर 'मायेची उब' मिळावी म्हणून. अखेरच्या क्षणीही माणसाला आपली प्रिय व्यक्ती जवळ असावी असं वाटतं. ही प्रेमाची भूक हृदयाची असली तरी प्रेमाची तहान आत्म्याची असते. यालाच जीवन असे म्हणतात. जीवन असतो जन्म-मरणाचा खेळ. खेळ अविरतपणे चालूच असतो.

'' हे ऋतू आले ते ऋतू गेले ! नविनतेचे खजिने भरले !

जन्मासंगे मरणही आले ! म्हणोनी जन्म आनंद सोहळे !!

निसर्गात जसा ऋतूंचा पाठशिवणीचा खेळ अखंड चालू असतो, तसाच मृत्यू येतो , तो हे जीवन विझवायला आणि नवीन जन्म द्यायला.



सावंत प्रियांका राजेंद्र
बी. एस्सी. ३

## पुस्तकं

पुस्तकं सांगतात गोष्ट
वाहून गेलेल्या दिवसांची
युगायुगाची, विश्वाची, माणसाची,
आजची, कालची, उद्याची.....
प्रत्येक व एकेक क्षणाची
पुस्तकं काही सांगू इच्छितात
आपल्या सावलीत रांगू इच्छितात,
पुस्तकात पक्ष्याची चोच बोलते,
पुस्तकात प्राण्यांची भाषा कळते,
पुस्तकात हिरवंगार रान हलते.
पुस्तकात असतो पाण्याच्या झऱ्याचा
अवखळपणा,
पुस्तकात असतो क्षेपणास्त्राचा विद्ध्वंस
पुस्तकात शब्दांना करुणेची झाक आहे,
विज्ञानाची हाक आहे, मायेची आस असते
पुस्तकात सुंदर जीवनाकडे जाणारी
सुंदर अशी वाट असते.

– माणिक सुभाष पाटील
बी. एस्सी.-३

# प्रेम आणि भावना

– कु. शुभांगी प्रभाकर कोरे

का कळत नाही ? पण हल्ली मन थोडं कठोर झालंय. प्रेम या शब्दाचा जिव्हाळा, थोडा कमी झालाय. प्रेम, प्रेम, प्रेम बस्स झालं आता. अरे एखादी गोष्ट आपल्या आयुष्यात होणारच नाही, मग त्या गोष्टीचा विचार वारंवार का ? तिला माहीत आहे, की ती माझी होऊ शकत नाही आणि मला माहीत आहे, की मी तिचा होऊ शकत नाही. दोघांची कळकळ अशी झाली आहे, जसं आळवाचं पान आणि त्यावरचा थेंब स्पर्श होऊ शकेल; पण एक जीव उभ्या जन्मात नाही माझ्या मनातल्या भावना तिच्या मनात कधीच पोहोचल्या आहेत आणि माझ्या मनातल्या भावनाही माझ्या मनात पोहोचल्या आहेत. दोघांच्या भावनेत प्रेम आहे. हे दोघानांही माहीत आहे आणि या भावना स्पष्ट का होत नाहीत ? नाही, कधीच होणार नाहीत. त्या मागे एकच कारण असावं. दोघांनाही एकाच बंधनामध्ये जखडून ठेवलंय. संस्कार, माझी लाडली, लहानाचं मोठं केलं. पोरीनं जे मागितलं, ते बापानं पुरवलं आणि शेवटी काय ? माझी पोरगी पळून गेली. रस्त्यानं जाताना बायकांची होणारी कुरबूज ही बघ हेची पोरगी पळून गेली त्या दिवशी अशी माझ्या काळजाला चीरा पडू नयेत म्हणून पोराला लहानाचा मोठा केला. सदा फाटकी बनियन घातली; पण पोराच्या कपड्याची इस्त्री कधी चुकवली नाही. अरे ! काय नाही केलं त्या बापानं माझ्यासाठी. स्वतःच्या पोटाची खळ घेतली आणि त्या लेकाला डॉक्टर, इंजिनिअर बनवलं. पप्पांनी एकच मागितलं माझ्याकडे. पोरा आपल्या जातीचीच पोरगी कर हा लेका. आयुष्यात एकच गोष्ट मागितली बापानं आणि मी तीही पूर्ण करू नये. खरंच संस्कार म्हणजे बंधन नाही. संस्कृती जपण्यासाठी दोन जीवांच्या लागलेला लळा म्हणजे संस्कार आणि मग ह्या लळ्यांपुढे बाकी सर्व गोष्टी स्वा..... आणि मग आम्ही म्हणतो, 'आमच्या नशिबात प्रेमच नाही.'

सुविचार :– तुमच्याने पुढे जावत नसेल, तर जाऊ नका; पण निदान मागे तरी येऊ नका.



# 'हीच आमची वेळ'

– दीपक तानाजी कांबळे
बी.एस्सी. ३

एका विहिरीमध्ये काही बेडूक असतात व त्यांचा बाहेर येण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न चालू असतो. कारण त्या विहिरीतील पाणी आटत आलेले असते. त्या साऱ्या बेडकांचा आरडाओरडा ऐकून बाहेरील बेडूक डोकावून पाहतात. त्यांच्या लक्षात येते, की आतील बेडूक बाहेर येण्यासाठी प्रयत्न करत आहेत; तेव्हा ते त्यांना प्रोत्साहन देतात पण काही वेळाने त्या बेडकांतील दोन-तीन बेडूक मरण पावतात. त्या वेळी वरील बेडूक त्यांना उड्या मारण्यास नकार देतात. उड्या मारण्यास मनाई करतात, कारण त्यांचाही असाच मृत्यू होईल, असे त्यांना सांगतात. त्या वेळी त्या बेडकांतील एकच बेडूक आपला उड्या मारण्याचा प्रयत्न सुरू ठेवतो. बाकीचे त्याला विरोध करतात; पण तो आपला प्रयत्न जोमाने करतो व अखेर तो विहिरीच्या बाहेर पडतो. बाकीच्यांना काही समजतच नाही, की हे कसं काय शक्य झालं? त्यांनी त्याचा शोध घेण्यासाठी एक समिती स्थापन केली. त्या समितीने कसून अभ्यास केल्यानंतर शेवटी असा एकच ओळीचा अहवाल/निष्कर्ष काढण्यात आला, की तो बेडूक बहिरा होता. गोष्ट संपली; पण आपण काय शिकलो? विनोदाचा भाग सोडला तर तो जो बेडूक आपल्या जबर इच्छाशक्तीच्या जोरावर बाहेर तर आलाच; पण या समाजात असे काही विहिरीबाहेरील बेडकांच्या स्वभावासारखे, जसे की आपण म्हणतो तसे विंचवाच्या जातीचे अगदी त्याचप्रमाणे नकारात्मकता पसरविण्यात जास्त पटाईत असतात. तो बेडूक बहिरा असल्याने वरील बेडूक आपल्याला चिअर्स करत आहेत, याच हेतूने आपण प्रयत्न करायचे असे ठरवले व त्याचप्रमाणे तो त्या प्रयत्नात यशस्वी झाला व तो बाहेर येऊन जीव वाचवण्यात यशस्वी झाला. अगदी याच बेडकाप्रमाणे आपणसुद्धा या समाजातील नकारात्मक गोष्टीकडे पाठ फिरवली पाहिजे. आपणसुद्धा बहिरेच झाले पाहिजे, नाहीतर आपल्यालासुद्धा त्या नकारात्मक गोष्टीमुळे कधीतरी जीवन गमवावे लागेल, त्यामुळे 'Think Positive' आणि प्रयत्नाच्या सांगडीतून यशाची कमान उंच करण्यासाठी आपण सज्ज असलो पाहिजे. विशेष म्हणजे

"जगा इतके की आयुष्य कमी पडेल,
हसा इतके की आनंद कमी पडेल
काही मिळाले तर नशिबाचा खेळ आहे; पण प्रयत्न इतके करा, की परमेश्वराला देणे भागच पडेल..."

कोणतेही काम अडथळ्यावाचून पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करीत राहतात, त्यानांच यश प्राप्त होते, त्यामुळे या जगात अशक्य असं काहीच नाही. त्यासाठी फक्त तुमच्या ठायी जबरदस्त इच्छाशक्ती पाहिजे. अशक्य म्हणजे 'Impossible'

हाच शब्द स्वतःला म्हणत असतो, 'I'm Possible' की म्हणजे मला शक्य आहे. तर मग चला तर मग स्वामी विवेकानंदांच्या मताप्रमाणे "Arise Awake and Stop not still the goal is Achieved !" आपण आता इतके प्रयत्न करू या की ध्येय प्राप्त झाल्याखेरीज माघार नाही, कारण बराक ओबामांच्या शब्दामध्ये सांगायचे झाले तर

***" This is our Time."***

## ध्येय वेड

जी माणसं ध्येयाकडे
नजर ठेऊन वाटचाल करत असतात,
ती सतत धडपडत असतात.
लोकांच्या दृष्टीने ती नेहमी पडत असतात
पण खरं ती पडत नसतात,
तर ती पडता पडता 'घडत' असतात.

**– निवास नामदेव जाधव**
बी. ए. भाग १

## ''मन उदास होताना''

मन उदास होताना...
मी माझा राहत नाही
मन उदास होताना...
मी माझा राहत नाही,
राहून राहून वाटते
काय मिळवले येऊन
आपल्यांना सोडून
सगळे विसरून,
ना कोणी मित्र
ना सोबती आसपास
मी एकटाच
मी एकटा उदास.
एकटेपणाच्या या जगात
एक वेडी आस होती
विरहाच्या या दुःखात
ती पण मला सोडून गेली,
आता हे शब्दच माझे सखे
हेच माझे मित्र हेच सोबती
जेव्हा कुणी ही नसतं
माझ्या अवती भवती,
का आलो मी इथे
आपली कोणी नाही जिथे
एक विचार सांगून गेला
काय मी योग्य निर्णय घेतला ?

**– दीपक राजाराम पोवार**
बी. एस्सी.–३

# मनाच्या कोपऱ्यातून....

- कु. पाटील श्वेता साताप्पा
बी. एस्सी. २

हाय फ्रेंड्स.... कॉलेजच्या नोटीस बोर्डवर 'स्पंदन'साठी हस्तलिखित देण्याविषयी वाचलं. वाटलं आपणही काहीतरी दिलं पाहिजे; पण द्यावं काय...?? हा प्रश्नही होताच. कारण कविता द्यावी, तर मला कुठे येते कविता करता. एखादा निबंध द्यावा, तर तुम्ही म्हणणार जास्त तत्त्वज्ञान नको. मग म्हटलं की सगळच कॅन्सल करण्यापेक्षा लिहूया काहीतरी आपल्या कॉलेजविषयी, स्वत:विषयी, आपल्या फ्रेंड्सविषयी...

'दूधसाखर महाविद्यालय बिद्री' आपलं कॉलेज.

कॉलेजची इमारत, कॉलेजचा परिसर अगदी मनात भरण्यासारखा. २०१३ ला मी या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतलं आणि कधी या कॉलेजमध्ये रुळले, ते काही कळलेच नाही. असंच तुमच्यापैकी बऱ्याचजणाचं झालं असेल ना??? खरंच, पहिल्यांदा खूप भिती वाटत होती, की कसं असेल आपलं कॉलेज? मला कुणी फ्रेंड्स तर मिळतील ना? शिक्षक कसे शिकवत असतील? मला ॲडजस्ट तर होता येईल ना कॉलेजमध्ये? पण कॉलेज जॉईन केलं आणि सगळी भीती कुठल्या कुठे पळाली. सगळ्या शंका हवेत विरल्या. बघताक्षणीच कुणालाही आवडावं असंच आहे आपलं कॉलेज. अन् फ्रेंड्स तर इतके मिळाले, की खरं कॉलेजलाईफ काय असतं ते समजलं. या सर्वांमुळेच 'फ्रेंडशिपचा' आणि 'कॉलेजलाईफचा' नवीन अर्थ समजला.

'कॉलेजलाईफ'. किती छान वाटतो ना हा शब्द. हायस्कूलपर्यंतची सर्व बंधने झुगारून आपण उंच आकाशात आनंदाने विहरणाऱ्या पक्षाप्रमाणे स्वतंत्र होतो. कॉलेजच्या कॅम्पसमध्ये रमून जातो. असं म्हणतात, की कॉलेजलाईफ म्हणजे 'फुल ऑन मस्ती', 'एन्जॉयमेंट'; पण कॉलेजलाईफ म्हणजे नुसता एन्जॉयच का? तर नाही. इथेच आपल्या जीवनाला खरा अर्थ मिळतो. याच टप्प्यावर आपल्या आयुष्याला वळण लागते. एक जबाबदार 'विद्यार्थी आणि व्यक्ती' होण्याचा हा टप्पा. हायस्कूलपर्यंत आपला पाया पक्का झालेला असतो. कॉलेजमध्ये भिंतीना आकार मिळत जातो आणि आपण आपल्या करिअरच्या दिशेने वाटचाल करताना जीवनाच्या इमारतीचा कळस पूर्ण होतो. आपल्याला हे पटतं; पण नुसतं पटून काय उपयोग? ते म्हणतात ना, 'कळत पण वळत नाही', तशीच आपली अवस्था असते. एकतर आपल्याला कुणी काही चांगलं सांगितलं, उपदेश केला तर पटत नाही. आपण म्हणतो, की आता कॉलेजमध्ये नाही तर काय म्हातारपणी एन्जॉय करायचा? अशा वेळी आपले डायलॉग ठरलेले असतात, 'ये उम्र सुधरने की नहीं बिघडने की है।' अन् असं म्हणताना सगळच बिघडून

असतं. असं म्हणताना 'सुशिक्षित बेकार' म्हणून समाजात वेगळा वर्ग निर्माण होतो. वेळ निघून जाते आणि पश्चाताप करत बसण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही.

कॉलेजमध्ये जे निरनिराळे उपक्रम राबविले जातात म्हणजे विविध प्रकारच्या स्पर्धा, मार्गदर्शनपर व्याख्याने, वक्तृत्व, एन.एस.एस.चे कॅम्प्स, टिचर्स डे, ट्रेडिशनल डे, गॅदरिंग अशा अनेक प्रकारच्या अभ्यासेतर उपक्रमामुळे कॉलेज लाईफला वेगळच महत्त्व प्राप्त होतं. स्वतःला सिद्ध करण्याची संधी आपल्याला मिळत जाते. आपला आत्मविश्वास वाढीस लागतो. आपल्या व्यक्तिमत्त्वाला खतपाणी मिळून त्याचं सुंदर झाडात रूपांतर होते. खरंच, जर या एक्स्ट्रा क्युरिक्युअर ॲक्टिविटीज नसत्या, तर किती कंटाळा आला असता कॉलेजचा, आपल्या कॉलेजलाईफचा!

आपल्या जीवनात, आपल्या कॉलेजमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात ते म्हणजे शिक्षक. आपल्याला योग्य दिशा दाखवण्याचे काम ते करतात. कुंभार जसा मातीच्या गोळ्यापासून सुंदर घडा बनवतो, तसंच आपले शिक्षक आपल्या आयुष्याला आकार देण्याचे काम करतात; पण आपण अनुभवतो की इतकं चांगलं शिकवूनसुद्धा काहींना लेक्चर्सना बसू वाटत नाही. लेक्चर्स सोडून कॉलेज कट्ट्यावर टवाळक्या करणाऱ्यांची कीव येते. अशा वेळी या सर्व गोष्टींना कुठे तरी आपले फ्रेंड्स सर्कलसुद्धा जबाबदार असतं आणि मग या सर्व करामतींना रिझल्ट परीक्षेवेळी अनुभवायला मिळतो. 'एकमेका साह्य करू' अशी परिस्थिती दिसून येते.

कॉलेजमध्येही दोन वर्षे कशी भुर्रकन उडून गेली, ते काही समजलंच नाही. खूप काही दिलं या कॉलेजनं आपल्याला. बरं. खूप काही लिहित नाही; पण मनाच्या कोपऱ्यातून जे डोकावलं, तेच कागदावर उतरवलं. जे वाटलं ते बोलून मोकळे झाले; पण मॉरल ऑफ द स्टोरी हेच, की खूप अभ्यास करा, खूप एन्जॉय, मस्ती करा आपल्या फ्रेंड्सबरोबर....

Best luck to all for your future life....!!

⅄⅄⅄



# बाप

कधी-कधी वाटते
बाप रे बाप
पण.......
डोळ्यांत पाहिलं तर......
असंख्य ताप.
प्रसंगी हळवा
तितकाच प्रेमळ
मुलांच्या संगोपनात,
तितकाच सोज्ज्वळ
मनात चिंता कुटुंबाची,
तरीही
तयारी ओझे वाहण्याची.
ओझ्यानं थकला; तरी
ओठावर स्मित
हेच असे खरं बापाचं गीत.
दुःखात सदैव
शांत-निशांत
सुखात कधीच वाहून नाही जात
शरीर थकलं तरी....
मन असे ताजं.
भविष्याचं काळजीचं
घेतो मनावर वाहून ओझं.
आई स्मरते तरी
बाप आठवत नाही.
पडद्यामागच्या भूमिकेतून
तो कधीच घटत नाही.
बाप आणि आई
साऱ्या जन्माचे सोबती
आयुष्य संपलं तरी,
त्यांची कळत नाही महती....
त्यांची कळत नाही महती....
त्यांची कळत नाही महती...

– कु. संकपाळ सुप्रिया शहाजी
बी. ए. एस. वाय.



सचिन तानाजी सुतार
बी. ए. २

## माझे महाविद्यालय

नाव माझ्या महाविद्यालयाचं आहे खूप मोठे
तरी लोक विचारतात मला, ते आहे तरी कोठे ?
पत्ता सांगताना महाविद्यालयाचा , होती चांगलीच गंमत
शेवटी सांगतो मी त्यांना
अहो ! बिद्री कारखान्याशेजारी इमारत माझ्या महाविद्यालयाची
आहे वाढत्या अंगाची
थोडी पांढरी, तर थोडी बिनरंगाची
दर्जा माझ्या महाविद्यालयाचा आहे अ.अ +
एकाच इमारतीमध्ये आहेत कित्येक विभाग
शिक्षक मात्र आमचे
उत्साही आहेत फार, दररोज व्याख्यान घेतात
चार पैकी चार
कलाकार माझ्या महाविद्यालयाचे आहेत अति उत्तम
कधीतरी नक्कीच घडेल, फिरोदिया आणि पुरुषोत्तम
ही तर एक कविता आहे
पण आहे तितकी खरी, सहज म्हटलं तरी लिहूया
आपल्या कॉलेजची हिस्ट्री

– कु. विद्या पाटील
टी. वाय. बी. ए.

## "एक आठवणीचा क्षण"

पहिल्यांदा नजरेस आले बिद्रीचे कॉलेज
तेथे वाढत असणार मुलांचे नॉलेज
आजूबाजूला रम्य अशी नारळाची झाडी
त्याच्या सावलीत सरांची होती गोडी
मध्येच जाताना दिसतो पूल
तो तर एकदमच आहे कूल
नव्या-जुन्या सर्व मैत्रिणी भेटल्या
मला तर आनंदाच्या उकळ्या फुटल्या
मनामध्ये पेपराची एकच लागली होती हूरहूर
कारण सगळ्यापांसून मी होते ना दूर
म्हणता म्हणता सर्व पेपर संपले
पण मनाचे मोती मनातच लपले

– कु. देवर्डेकर अंकिता अनिल
बी. ए. भाग १

## असेही जगून बघा

कधीतरी असेही जगून बघा
माणूस म्हणून जगताना
एक हिशोब तर करून बघा !
किती जगलो याऐवजी कसे जगलो
हा एक प्रश्न मनाला विचारून बघा...
असेही-कधी जगून बघा
कधीतरी एखाद्यावर विनोद करण्याआधी
समोरच्यांचा विचार करून बघा
तर कधीतरी कोणाच्या हास्यासाठी, समाधानासाठी
न आवडलेल्या विनोदावर हसून तर बघा...
कधी असेही जगून बघा
वर्तमान आणि भविष्याची चिंता तर सदाचीच
असते कधीतर भूतकाळाच्या विश्वात गुंतून
तर बघा काळाची वाळू हातातून निसटली
म्हणून काय झाले... ?
आधी अनुभवलेला क्षण पुन्हा एकदा जगून तर बघा...
कधी असेही जगून बघा
प्रतिसादाची काळजी का करावी नेहमी
एखाद्यावर जिवापाड, निर्मळ प्रेम तर करून बघा...
जीवन असेच आहे
आनंदाने जगून बघा....

– कु. तिरवडे विजया शितल
बी. एस्सी.-३

## प्रेमीयुगुल

जसे आळवावरचे पाणी
तसे प्रिया मन तुझे चंचल
पडते शब्दांच्या प्रेमात
अन् विसरून जगते क्षणभंगूर
त्या दवाचा बनावा मोती
वाटत होते माझ्या मना
पण वेडे तुझे मन
चंचल तुझा स्वभाव
याच चंचल स्वभावाने
स्वीकारले नाही माझ्या
अस्तित्त्वाला लावले नादी मला
पण स्वीकारले दुसऱ्याला
चूक असो तुझी वा माझी
शोध घेईल तो आसिम काळ
तोपर्यंत निघून गेली असेल वेळ
असी गोष्ट चंचल प्रेमीयुगुलाची

– केसरकर राजवर्धन नंदकुमार
बी. एस्सी. भाग-३



## मनातली गोष्ट

जगाला वेड लावणारी एकच
गोष्ट म्हणजे प्रेम
तिच्याबरोबर हसणं, बोलणं, रडणं
संसार थाटण्यासाठी
मांडलेला एक छोटासा गेम
छोटसं घरटं आणि सुख-दुःखात
पुसलेल्या आसवाचा थेंब
जगाला वेड लावणारी एकच
गोष्ट म्हणजे प्रेम
वेड थोडं माझ्या मनाचं
वेड थोडं तिच्या मनाचं
जगानं वेडं ठरवलेल्या
आपल्या प्रेमाचं
मनात खूप बडबडलो तरी
प्रत्यक्ष शब्द येत नाहीत बाहेर
घरी आल्यावर कवितांचा असतो आहेर
कोणी मला सांगा
माझे प्रेम तिला समजेल का?
रातराणीसारखा प्रेमाचा
सुगंधही पसरेल का?
खुपदा वाटलं तिनं माझ्या
मनातलं ओळखावं...
माझ्या मनातला सार काही न
बोलता तिला कळावं
न बोलता तिला कळावं.

– वैभव कांबळे
बी. ए. भाग १

## मैत्री कशी असावी

मैत्री असावी फुलासारखी
सुगंध एकमेकांना देणारी,
मैत्री असावी चंद्रासारखी
शीतलता प्रदान करणारी,
मैत्री असावी अशी
शब्दातून जाणणारी,
नजरेतून समजणारी,
स्पर्शातून उमगणारी,
जिव्हाळा आणि प्रेमातून फुलणारी,
परिजातकासारखी सुगंध देणारी
सुखात सहभागी होणारी
दुःखात मात्र साथ देणारी
अखंड झऱ्यासारखी वाहणारी
कधी कुणाला न तुटणारी
शुद्ध सोन्याप्रमाणे चमचम करणारी
अखंड अमर राहणारी
नंदादीपाप्रमाणे तेवत राहणारी
अशी असावी मैत्री...

– कु. पाटील करिश्मा
बी. ए. भाग-३

# इच्छा

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही,
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा...
माझ्या दुःखी व्यथित मनाचं तू सांत्वन कर अशी माझी अपेक्षा नाही,
दुःखावर मला जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा...
माझ्या मदतीला कोणी आलं नाही तरी माझी तक्रार नाही,
माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा...
माझी फसवणूक झाली तर तू सावरावस अशी माझी तक्रार नाही,
माझं मन खंबीर रहावं एवढीच माझी इच्छा...
माझं तारण तू करावसं, मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही
तरुण जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा...
माझं ओझं हलकं करून तू माझं सांत्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते वहायचं शक्ती माझ्यात असावी एवढीच माझी इच्छा...
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन मी तुझा चेहरा ओळखून काढेनच
मात्र दुःखाच्या रात्री सारं जग जेव्हा माझी फसवणूक करेल तेव्हा,
तुझ्याविषयी माझ्या मनात शंका येऊ नये
एवढीच माझी इच्छा...

– पाटील अमर आबासो
बी. एस्सी. भाग३

## मी म्हटलं : 'बरं'!

मी जन्माला आलो... मोठा होऊ लागलो...
ते म्हटले : 'आता शाळेत जा...
मी म्हटलं : 'बरं'!
मी मस्ती करू लागलो
ते म्हटले : 'लहान आहेस का आता ? शहाण्यासारखं वाग...!'
मी म्हटलं : 'बरं'!
माझी दहावी आली
ते म्हटले : 'आता खेळणं पुरे, अभ्यास कर.'
मी म्हटलं : 'बरं'!
दहावी पास झालो
ते म्हटले : 'अभ्यास कमी पडला, नाही तर अजून मार्क्स मिळाले असते...!'
मी म्हटलं : 'बरं'!
मग मी कॉलेजात गेलो.
ते म्हटले : 'मुलींची भानगड नको हो...!'
मी म्हटलं : 'बरं'!
मी खेळात अव्वल होतो
ते म्हटले : 'शेवटचच वर्ष आहे, नंतर वेळच वेळ आहे.'
मी म्हटलं : 'बरं'!
मी ग्रॅज्युएट झालो.
ते म्हटले : 'नोकरी कर.'
मी म्हटलं : 'बरं'!
माझं प्रमोशन झालं.
मुलींची भानगड नको म्हणणारे ते आता म्हटले : 'आता मुलगी बघ'
मी म्हटलं : 'बरं'!
ते म्हटलं 'हिला पसंत कर...'
मी म्हटलं : 'बरं'!
ते म्हटलं : 'आता आम्हाला काका, काकू वगैरे वगैरे बनव...एकदा नाही, दोनदा बनव...'

मी म्हटलं : 'बरं'!

ते म्हटले : 'तुझी मुलं मोठी झालीत...घर भरलंय... आता तू सुखी आहेस... तू आता संसारातून हळूहळू बाजूला व्हायला शिक...'

मी म्हटलं : 'बरं'!

पण बाजूला होण्याआधी मी माझ्या मुलाला म्हटलं : 'तू मात्र आयुष्यात तुला जे वाटेल, तेच कर.'

तो म्हटला : '..........!'

– प्राजक्ता शिंदे
बी. ए.-२

# भावाने बहिणीला लिहिलेले पत्र

प्रिय,

दालचिनीताईला

जायफळ दादाचा सांष्टाग नमस्कार

पत्र लिहिण्यास कारण, की काजूकाका सुखरूप आहेत. आनंदाची बातमी म्हणजे जीरेकाकांचे लग्न मिरी यांची सुकन्या चि. सौ. कां. लवंग हिच्याशी ठरविले आहे. बदाम व पिस्ता यांची तब्येत ठीक आहे. कडुलिंब अजून लहान आहे. तो दररोज शाळेत जातो; पण मोहरीचे वय बसत नसल्याने तिला शाळेत घातलेलं नाही.

चहापती आणि साखर यांच्या लग्नाला कुटुंबाकडून नकार मिळाल्याने त्या दोघांनी काल सकाळी उकळत्या पाण्यात उडी मारली. बटाटेमामा विळीवर पडून मरण पावले, तेव्हापासून कांदेमामा रडत आहेत व इतरांनाही रडवत आहेत. आता माझे पत्र संपवतो.

कळावे, लोभ असावा

माझा पत्ता,
खलबत्ता बेपत्ता
ता. अलीकडे, जि. पलीकडे,
मु.पो. सगळीकडे
पिन कोड नंबर लावील तिकडे

– कु. पाटील सुरेखा मधुकर
बी. ए. भाग – १

## जीवन

जीवन एक कर्तव्य आहे, ते पार पाडा
जीवन एक खेळ आहे, तो आनंदाने खेळा
जीवन हे गीत आहे, ते मस्तीत गा
जीवन हे सौंदर्य आहे, त्याची पूजा करा
जीवन ही एक प्रीती आहे, तिचा आस्वाद घ्या
जीवन हे एक आव्हान आहे, त्यास सामोरे जा
जीवन ही एक संधी आहे, ती दवडू नका,
जीवन हे एक दुःख आहे, त्यावर मात करा
जीवन एक रहस्य आहे, ते हळूवार उघडा
जीवन हे एक संघर्ष आहे, ते निखराने लढा
जीवन हे जीवन आहे, ते जागरूकपणे जगा.

**– आदिनाथ शामराव मस्कर**
बी. एस्सी. भाग १

## पहिला पाऊस

पहिला पाऊस
मनात घर करून गेला
पण त्या मनातील घराला
हळवं करून गेला
पहिल्यांदा तो बरसला
ढगांचा ढोल गरजला
तप्त मातीवरती पडून
तो न विसरणारा सुगंध देऊन गेला.
जमिनीत पेरलेलं बीज
आसुसलं होतं एक-एक थेंबासाठी
पण तोच प्रत्येक थेंब धडपडत होता
त्याच्या सुंदर जगण्यासाठी
पीक बहरलं होतं
बरसण्याचं त्याचं सातत्य पाहून
नवीन जगणं शोधत होतं
त्याच्याच अस्तित्त्वात राहून
पावसाचा प्रत्येक थेंब
जगणं सुंदर करत होता
त्याच्या त्या बरसण्यात
असमंत सारा नटला होता

**– विनायक शंकर कुंभा**
बी. एस्सी.-

# प्रेम

प्रेम म्हणजे कळत-नकळत
घडणारी गोष्ट असते
पण प्रेमात पडल्यावर निम्मे
आयुष्य वेस्ट असते.
प्रेम म्हणजे बेभान,
वाहणारा वारा
पण प्रेमात पडल्यावर
डोळ्यांतून पडतात
आसवांच्या धारा.
प्रेम म्हणजे निळेशार आकाश,
पण ते सोडून गेल्यावर
जीवन वाटते भकास.

- समीर मारुती कांबळे
बी. ए. भाग १

# मन...

मनाचा गुंता की,
गुंत्यातलं मन
सांगणं कठीण पण
ऐकतय कोण ?
शब्दांची गुंफण
गुंफणातील गाणी
सुरेल आहेत पण
गातय कोण ?
पावसाच्या धारा
धारांचा शहारा
घ्यावसा वाटतोय पण
भिजणार कोण ?
मित्रांचा सहवास की
सहवासातलं प्रेम
आठवण नाही पण
विसरतय कोण ?

- रणजित दि. गायकवाड
बी. ए. भाग -१

## आठवण येताच

हसता हसता डोळे अलगत येतील हो भरून
बोलता बोलता शब्द जातील हो विरून
कावरं बावरं होण्यासारखं बिलकुल काही नाही
कुणीतरी आठवण काढतय बाकी काही नाही...
रस्त्यामध्ये दिसताच की चेहरे येता जाता
मला सारखेच दिसू लागतील सहज बघता बघता
अवती-भोवती सगळीकडे तेच माणूस दिसेल
सृष्टीमध्ये दोनच जीव...आणखी कोणी नसेल
भिरभिरल्यागत होण्यासारखं बिलकुल काही नाही
कुणीतरी आठवण काढतय बाकी काही नाही
मोबाईल वाजण्याआधीच तो वाजल्यासारखा वाटेल
जुनाच एस.एम.एस. काढून वाचावासा वाटेल
दिवस सरता वाटत जाईल उगाचच
उदास पावलो-पावली जड होत जाईल
श्वास श्वासातच
घाबरून गोंधळून जाण्यासारखं बिलकुल काही नाही
कोणतरी आठवण काढतय बाकी काही नाही
जेवता जेवता जीवघेणा लागेल ठसका
घरचे म्हणतील सारखा कसा लागतो उठता-बसता
चेहरा लपवून, डोळे पुसून पाणी प्यावे थोडे
बोलण्याआधी आवाजाला सांभाळावे थोडे
सांगून टाकावं त्यांना काळजीसारखं
बिलकुल काही नाही
कुणीतरी आठवण काढतंय...
बाकी काय नाही

**– संतोष शिवाजी जितकर**
टी. वाय. बी. ए.

## मैत्री म्हणजे...

मदतीचा हात म्हणजे मैत्री
अडचणीची साथ म्हणजे मैत्री
हृदयाचे स्पंदन म्हणजे मैत्री
भावनांचे मिलन म्हणजे मैत्री
प्रेमाचा सहवास म्हणजे मैत्री
तिरस्काराचा नाश म्हणजे मैत्री
दुःखाचा विसर म्हणजे मैत्री
सहानुभूतीची फुंकर म्हणजे मैत्री
वचनाची आण म्हणजे मैत्री
आपुलकीची हाक म्हणजे मैत्री
पाठीवरची थाप म्हणजे मैत्री
मैत्रीत नसावा कसलाच स्वार्थ
त्यात असावा फक्त प्रेमाचा भावार्थ...

**– सुनिल गजानन पाटील**
बी. ए.-२

# प्रेम

प्रेम एक वारा, बेभान वाहणारा

प्रेम एक पाऊस, वेडापिसा कोसळणारा

प्रेम एक मन, हळूवार जपणारे

प्रेम एक अतुट नातं, हवेहवेसे वाटणारं

प्रेम एक गीत, जे कायम ऐकावेसे वाटणारे

प्रेम एक सुंगध बिनधास्त दरवळणारा

प्रेम एक गाठ असते, तेथे कोणत्याही मतभेदाला थेट वाट नसते

प्रेम म्हणजे

पाऊस नसला तरी, चिंब-चिंब भिजणं असतं

डोळा चुकवून साऱ्यांचं, एकटं-एकटं रडणं असतं

**– विकास तुकाराम कांबळे**

बी. ए. भाग १

हास्यविनोद

१) आंधळा

भिकारी : हे सुंदरी, मी आंधळा आहे. मला पाच रुपये दे

भिकाऱ्याचे हे वाक्य ऐकून नवरा बायकोला म्हणाला, त्याला पाच रुपये दे. त्याने तुला सुंदरी म्हटले, बिचारा खरोखरच आंधळा दिसतोय.

२) शाप

पोलीस : मॅडम, तुम्ही खूप बहादूर आहात, रात्री घरात घुसलेल्या माणसाला काय सॉलिड मारलात तुम्ही!

मॅडम : काय बहादूर वगैरे काही नाही. मला काय माहीत तो कोण आहे? मला वाटलं आमचे हे रात्री उशिरा घरी आले म्हणून !

अजय कृष्णात तौंदकर

बी. एस्सी.-२

# जीवन जगण्याचे मूलमंत्र

कुणीही कसं दिसावं यापेक्षा कसं असावं याला महत्त्व आहे. ते शक्य नसेल, तर जास्तीत जास्त कसं नसावं याला तरी नक्कीच महत्त्व आहे.

वादळ जेव्हा येतात, तेव्हा आपण आपल्या मातीला घट्ट रुजून रहायचं असतं. ती जितक्या वेगाने येतात तितक्याच वेगाने निघून जातात. वादळ महत्त्वाचे नसते. प्रश्न असतो. आपण त्याच्याशी कशी झुंज देतो आणि त्यातून कितपत बऱ्या अवस्थेत बाहेर येतो याचा.

कबुतराला गरुडाचे पंख लावता येतीलही .... पण गगनभरारीचं वेड रक्तातच असावं लागतं .... कारण आकाशाची ओढ दत्तक घेता येत नाही.

आकाशात जेव्हा कृत्रिम ग्रह सोडतात तेव्हा गुरुत्वाकर्षनाच्या सीमेबाहेर त्याला पिटाळून लावेपर्यंतच सगळा संघर्ष असतो, त्याने एकदा स्वतः गती घेतली, की उरलेला प्रवास आपोआप होतो.

समाजात विशिष्ट उंची गाठेपर्यंत जबर संघर्ष असतो; पण एकदा अपेक्षित उंचीवर पोहचलात, की आयुष्यातल्या अनेक समस्या ती उंचीच सोडवते.

संध्याकाळच्या संधीप्रकाशतही जो टवटवीत राहील, त्याने दिवस जिंकला. अंत आणि एकांत ह्यापैकी माणूस एकांतालाच जास्त घाबरतो.

वाहतो तो झरा आणि थांबते ते डबके, डबक्यावर डास येतात आणि झऱ्यावर राजहंस.

